# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १३ अकोला, रविवार ता० ९ माहे नोव्हेंबर सन १८७९ इसवी. अंक ४४

## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु० |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळी पुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## मुंबई ब्यांक.

अमानत ठेविलेल्या पैशावर व्याजाचे दर.

१२ महिने ठेविल्यास दरसाल दर शेकडा ४ रुपये.

६ महिने ठेविल्यास ( ह्मणजे तारीख १ नोवेंबर पासून ता० ३० जूनपावेतों एकसारखे कोणतेही सहा महिनेपर्यंत दरसाल दर शेकडा ३ रुपये प्रमाणें.

सदर्हू प्रमाणें न ठेविल्यास दरसाल दर शेकडा २ रुपये प्रमाणें व्याज मिळेल.

तात्पुरची किंवा मुद्दाम व्यवस्था केल्याशिवाय कमी मुदतीपर्यंत अथवा अधिक व्याजानें अमानत पैसा ठेविला जाणार नाहीं.

चालू अमानत पैशाच्या खात्यावर व्याज दिलें जाणार नाहीं.

मुंबई.

तारीख १ आगष्ट सन १८७९ इसवी.

## जाहिरात.
## वऱ्हाडवक्तृत्वोत्तेजक मंडळीकडून.

देण्यांत येते कीं येत्या डिसेंबर महिन्याची तारीख २६ रोज शुक्रवारपासून या मंडळीचा पुढें लिहिल्या विषयांत उमेदवारांची परीक्षा घेऊन बक्षिसें देण्याचा वार्षिक समारंभ सुरू होणार आहे याजकरितां ज्या उमेदवारांची परिक्षेस येण्याची इच्छा असल त्यांनीं लेखी अर्ज खालीं सही करणाराकडे प्रमोद सिंधु छापखान्याच्या पत्यावर ता० १२ डिसेंबरच्या आंत पोचतील असे पाठवावे.

विषय पहिला-- "आपल्या लोकांची घरें व वागण्याच्या रीति यांपासून लोक समाजाच्या आरोग्यतेवर कांहीं वाइट परिणाम होतात काय? होत असल्यास कोणते? व त्यांचें निवारण करण्यास उपाय कोणते? व त्यांतून हल्लींच्या स्थितींत ते कितपत साध्य आहेत."

विषय दुसरा-- "सर्वांभूतीं द्यावें अन्न, द्रव्य पात्र विचारून॥ उपातिष्ठे बीज पेरिजे॥"

या तुकारामाच्या अभंगाच्या चरणावर व्याख्यान द्यावें.

येणेंप्रमाणें दोन विषय नेमिले आहते. पहिल्या विषयांत पहिलें बक्षीस ३० रुपयांचें व दुसरें २० रुपयांचें नेमलें आहे. दुसऱ्या विषयांत पहिलें बक्षीस २५ रुपयांचें व दुसरें १५ रुपयांचें नेमलें आहे.

परिक्षेस येणारे उमेदवारांनीं समारंभाचे पूर्वदिवशीं या सभेच्या चिटणिसास भेटावें.

उमेदवारांस लागू असण्याेच नियम खालीं दिले आहेत त्यांकडे अवश्य लक्ष द्यावें.

१ उमेदवारानें उभें राहून भाषण करावें व जवळ लेखी टिपण बोलते वेळीं ठेवूं नये.

२ उमेदवारांचें वय १६ वर्षांपेक्षां कमी नसावें.

३ प्रत्येक उमेदवारानें अर्ध्या तासावर भाषण करूं नये, परंतु जरूर वाटल्यास भाषण करणारास अर्ध्यातासा पूर्वींच रजा देण्याचा व वाटल्यास मुदत अधिक एक तासपर्यंत वाढविण्याचा अधिकार परीक्षकांस आहे. कोणी कोणाही व्यक्तीस अनुलक्षून लागून भाषण करील त्याचें भाषण बंद करण्यांत येईल.

४ ज्या उमेदवारांचे निरनिराळ्या विषयांत अधिक गुण लागतील त्या उमेदवारांस बक्षिसें दिलीं जातील. परंतु ½ पेक्षां गुण कमी लागल्यास मुळींच इनाम दिलें जाणार नाहीं.

सन्मानार्थ नेमलेल्या अगर दुसऱ्या एखाद्या स्वतंत्र विषयावर कोणाची भाषण करण्याची इच्छा असल्यास त्यास परवानगी आहे.

उमरावती १६ अक्टोबर १८७९ इसवी.

चिंतामण रामचंद्र
सभेचे चिटणीस.

## नोटिस.

नारायण वल्लद हरीबा लाहुळकर रहाणार मौजे माडका तालुके मलाकापुर यास नोटिस देणार कृष्णाजी रहाणार मौजे लाहुड तालुके मल्कापुर जिल्हा बुल्दाणा. नोटिस देतो ऐसाजे. माझी मुलगी नामे जानकीचें लग्न सुमारे १५ वर्षें झाले आहे. लग्न झाल्यावर दोन तीन वर्षांनीं तुह्मास रगतापितीचा दर्द झाला आहे. आणि तो दर्द आतां तुमचे अंगावर सर्व झाला आहे. आणि लग्न झाल्यावर तुह्मी आमची मुलगी इजला दोन वर्षेपर्यंत घेऊन गेला. नंतर माझी मुलगी माझेच एथें आहे. ती मुलगी माझे जवळ सुमारें १२ वर्षापासून मजपाशी आहे. तर मी तुह्मास नोटिशीनें कळवितो कीं, माझे मुलगीस दर वर्षास १५० रुपये खर्च खाण्या वस्त्रास लागत आहे. तर बारा वर्षाचे रुपये १८०० झाले आहेत. तर तुह्मी नोटिस पावल्या दिवसापासून २० दिवसांत घेऊन यावे. आणि तुह्मास रोग फार प्रकारें अंगावर झाला आहे आणि सदर्हू रुपये व परगांवचे पंच लोक घेऊन यावे ते खालीं लिहिल्याप्रमाणें

मौजे हिवरे एथील लक्ष्मण
खंडू आखऱ्या.
मौजे लाहुर एथील कृष्णाजी गायगोरू.
विठू खाकरे.

येणेंप्रमाणें पंच लोक- व रकम वीस दिवसांत घेऊन न आल्यास मग रीतीप्रमाणें तुमचेवर फिर्याद करून खर्च सर्व भरून घेईन आणि माझे मुलगीचा खाण्या पिण्याचा वस्त्र वगैरेचा बंदोबस्त वीस दिवसाचे आंत न केल्यास मी दुसऱ्यास पाट लाऊन देईन. आणि सदर्हू नोटिशीचा जबाब वीस दिवसांचे आंत द्यावा. आणि आह्मी तुह्मांस नोटिशीनें कळविलें आहे, ह्मणून वगैरे मजकूर तारीख ३ माहे नोवेंबर सन १८७९ इसवी.

( सही ) कृष्णाजी वल्लद राघो देवळे
रहाणार मौजे लाहुड ता०
मलकापुर निशाणी खुद

## जाहिराती.
## सुबोधसार.
भाग पहिला.

यांत राजनीति वगैरे अनेक ग्रंथांतून नीतिपर, बोधक, मनोरंजक, दृष्टांतिक, व अनुभवसिद्ध असे उत्तम निवडक श्लोक प्राकृत अर्थासह घेतले आहेत. अशा ग्रंथाच्या अवलोकनानें बहुतेक व्यवहारज्ञान व विशेषेंकरून नीतिशास्त्र वगैरे विषयांची चांगली माहिती होऊन सामान्य पुरुषासही व्यवहारांत समय विशेषीं कसें बोलावें व वागावें वगैरे अनेक प्रकारचें ज्ञान होण्यासारखें आहे ग्रंथ जाड कागदावर खिळे छापानें छापून विक्रीस तयार आहे. किंमत ०१० आणे टपाल खर्च ००६ आह्मांकडे पाठविल्यास पुस्तक ताबडतोब रवाना केलें जाईल. कळावें. ता. २६ अक्टोबर सन १८७९ इ.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## उमरावती स्टेटरेलवे.

या लेखावरून सर्वांस कळविण्यांत येते कीं येत्या नोवेंबर महिन्याची ता० पहिली व त्यानंतर खालीं लिहिल्याप्रमाणें उमरावती स्टेट रेलवेच्या गाड्या येण्याजाण्याच्या वेळांत फेरफार झाला आहे.

बदनेऱ्याहून सकाळीं सात वाजतां मिश्र गाडी निघेल ती उमरावती एथें सात वाजून तीस मिनिटांनीं पोंचेल व दुसरी संध्याकाळीं चार वाजतां मिश्र गाडी निघेल ती उमरावती एथें चार वाजून ३० मिनिटांनीं पोंचेल. उमरावतीहून सकाळीं पांच वाजून पंध्रा मिनिटांनीं मिश्र गाडी निघेल ती बदनेरा एथें पांच वाजून ४५ मिनिटांनीं पोंचेल. दुसरी मिश्र गाडी सकाळीं अकरा वाजतां निघेल ती बदनेरा येथें अकरा वाजून तीस मिनिटांनीं पोंचेल. स्टेशनावर मोठीं टाइम टेबलें लावलीं आहेत तीं पहावीं. ज्यास्ती माहिती पाहिजे असल्यास सर्व स्टेशनांवर अगर खालीं सही करणारांकडे मिळेल.

ट्राफिक सुपरिंटेंडेंट वऱ्हाड
स्टेट रेलवे
W. G. Chamberlain

## बुकसर्क्युलर नंबर ७ सन १८७९

अलीशान रेसिडेंट साहेब बहादुर यांनीं मुलूख अमानी हैदराबाद यांतील सर्व दिवाणी कोर्टांचे न्यायाधीश यांचे माहितीकरितां "दिवाणी मुकद्दम्याचे चौकशी संबंधी वहिवाटीचें टिपण" याजबद्दल ९६ कलमांचें एक सर्क्युलर नुक्तेंच प्रसिद्ध केलें आहे त्याचें मराठी भाषांतर मे० जुडिशियल कामिशनर साहेब बहादूर यांनीं छापविलें त्याच्या प्रति आमचेकडे विक्रीस आहेत. किंमत चार आणे. बाहेरगावीं एक आणा टपाल खर्च पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

मुकाम रिसोड तारीख २२।१०।८९ इ.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. आपले पत्रीं बरेच दिवसांनीं चार ओळी पाठविल्या आहेत; त्या मेहेरबानीनें प्रसिद्ध होतील अशी आशा बाळगतों.

नवीन बाजार बैठकीबद्दल मे० कमिशनर साहेब बहादूर प्रांत वऱ्हाड यांजकडून सर्क्युलर व दर आले, त्यांत पहिल्यापेक्षां दुप्पट दर असल्याचें समजतें. तेणेंकरून व्यापारी लोक नाराज आहेत. पूर्वींच्या सर्क्युलरांत तपसील होता; ह्मणजे १६ शेर धान्याचे आंत ओझें असल्यास त्यास माफी होती. तशी हल्लींच्यांत नाहीं. तेणेंकरून बाजार वसूल करणारे " जरी दोन शेर धान्य असलें तरी त्याजपासून " दर घेतात त्याप्रमाणें वाणी, कपडे विकणारे, यांचे पाशीं देशी परदेशी कपड्यांचा माल ८।१० रुपयांचा असला तरी त्यांचे पासून दोन आणे घेतात. त्या पैशापुरता नफा देखील मिळत नाहीं.

सदर्हू अडचणीमुळें दुकानदारानीं खेड्याचे बाजार सोडले. येणेंकरून बाजारची नुकसानी होण्याचा संभव दिसतो. किंबहुना खेड्याचे बाजार मोडतील. व्यापार कमी होईल. लोकांस मोठ्या अडचणी सोसाव्या लागतील.

मे. रिव्हिन्यु कमिशनर साहेब बहादुर प्रांत वऱ्हाड हे लक्ष पुरवून सदर्हूच्या अडचणी मोडतील व तपशील करितील. ह्मणजे कोणास अन्याय मिळणार नाहीं. अमूक शेर धान्यास माफी, अमुक रुपयांचे कपड्याचे दुकानास " देशी परदेशी " अमूक दर असें केल्यास बाजारचे लोकांस उत्तेजन मिळेल. बाजारची भरभराटी होईल, अशी आशा जाणून जाहिर केलें आहे.

जिकडे तिकडे हिवतापाचा आजार जारी आहे. पाऊस उत्तम झाला. पिकें चांगलीं

आहेत. धान्याचे भावांत फरक नाहीं. कळावें हे विनंती. तारीख २२ आक्टोबर

एक वर्तमानपत्र वाचणारा.

---

यादी मे० वऱ्हाडसमाचारकर्ते यांस इन्स्पेक्टर आफ पोस्ट आफीसेस वऱ्हाड यांजकडून लिहून जावयाचें असें कीं, तारीख २६ माहे आक्टोबर सन मजकूरचे आपले वर्तमानपत्रांतील पोस्ट हपीससंबंधी मजकूर पाहून कळविण्यांत येतें कीं, ज्यांच्याकडून आपणास मनीआर्डर आणि तिकिटें रवाना होऊन पोंचलीं नाहींत त्या लोकांचे अर्ज इकडे आल्यास चवकशी करण्यास ठीक पडेल याकरितां त्या लोकांस इकडे अर्ज करण्यास आपणाकडून सूचना व्हावी. जर अर्ज न आले तर आह्मांस चवकशी करण्यास मार्ग नाहीं.

वाशिम जिल्ह्यांत आपलीं वर्तमानपत्रें वक्तशीर न पोहोंचतां दोन दोन तीन तीन एकदम पोंहोचतात ह्मणून लिहिलें त्यास त्या वर्तमानपत्रांचे कव्हरावर दाखल तारीख लिहून तीं कव्हरें इकडे आल्यास हरकतीबद्दल तपास होऊन पुढें वक्तशीर मिळण्या विषयीं बंदोबस्त केला जाईल.

K. Taleboodeen

इन्स्पेक्टर आफ पोस्ट आफिसेस

वऱ्हाड.

---

## वऱ्हाडसमाचार.

---

मिति आश्विन वद्य १० शके १८०१

---

## मनीआर्डर्स किंवा सरकारी हुंड्या

लोकांचे सोईकरितां सरकार ज्या अनेक तजविजी करिते त्यांपैकींच लोकांस आपला पैसा पोंचविण्याची सोय करून देणें ही तजवीज सरकारानें अलीकडे केली आहे व ही फार चांगली आहे. हिजपासून लोकांस पुष्कळ उपयोग व फायदा झाला आहे यांत संशय नाहीं. व सरकारचेंही या कामीं नुकसान नसल्यामुळें त्यांनीं त्या कामांत अधिक सुधारणा व अधिक सोय करण्याच्या तजविजी चालू केल्या आहेत. इतके दिवस जिल्ह्याचे हुजूर गावाहून दुसरे जिल्ह्याचे हुजूर गावीं मात्र मनीआर्डर मिळत असे व तालुक्यांतून मिळण्याची कांहीं सोय नव्हती त्या अडचणीकडे सरकारानें लक्ष्य पुरवून जिल्ह्याच्या खजिन्याकडील मनीआर्डरचें काम काढून पोष्ट आफिसाकडे देण्याची येत्या जानेवारीपासून योजना केली आहे हें फार चांगलें झालें. त्या विषयींचे नियम गेल्या रेसिडेन्सी आर्डरमध्यें आमचे पहाण्यांत आले त्यांतील तात्पर्य आह्मी आपले वाचकांस कळवितों.

इंपेरियल पोस्ट आफीसें ज्यांची यादी पोस्टल गाईडमध्यें प्रसिद्ध होत असते त्या पोस्ट आफिसांतून ता. १ माहे जानेवारी स. १८८० इसवीपासून मनीआर्डर्स दिल्या घेतल्या जातील. रविवार, नाताळची सुटी, चक्रवर्तिनी साहेबांचा जन्मदिवस आणि गुडफ्रायडे हे दिवस खेरीज करून इतर सर्व दिवशीं दुपारचे बारा वाजल्यापासून संध्याकाळचे ५ वाजतपर्यंत पोष्ट आफिसांतून मनीआर्डर्सचें काम चालेल.

२ दरएक मनीआर्डरविषयीं निराळा अर्ज पाहिजे. अर्जाचा छापील नमुना पोस्टआफिसांतून फुकट मिळेल. त्या नमुन्यांत मनीआर्डर किती रुपयांची, कोणत्या पोस्ट आफिसास पाठवावयाची, मनीआर्डर करणार कोण, व रुपये कोणास मिळावयाचे तें स्पष्ट लिहीत जावें.

३ मनीआर्डर घेणारा व पैसे ज्यांस मिळावयाचे तो एकेकच मनुष्य असावा. दोघातिघांचे नावानें मनीआर्डर दिली घेतली जाणार नाहीं.

४ अर्जांत मजकूर स्पष्ट व सुवाच्य लिहावा व ज्याचे हातीं मनीआर्डरचे पैसे जावयाचे त्याचा पत्ता व खाणाखुणा तपशीलवार लिहाव्या कीं जेणेंकरून भलत्या मनुष्यास पैसा मिळणार नाहीं. पत्याचे व खाणाखुणाचे गलतीनें भलत्यास पैसा मिळाला तर जबाबदारी पोस्टआफिसावर नाहीं.

५ अर्ज लिहून पोस्टांत न्यावा किंवा पोस्ट आफिसांतच लिहावा, अथवा लिहितां येण्याची गैरसोय असल्यास पोस्टाकडील कामदारास मजकूर सांगून त्यांकडून लिहवावा.

६ मनीआर्डरकरितां अर्ज पोस्टआफिसाच्या खिडकीशी दिले पाहिजेत व त्यांबरोबर मनीआर्डरची रकम व तिचें कमिशन दिलें पाहिजे. त्याजबद्दल सही शिक्क्यानिशी पावती मिळेल. त्या पावतींत जेथें व जास रुपये पटवावयाचे तें नाव गाव पोस्टाकडील कामदार लिहून देतील तें नीट वाचून पहावें. व त्यांत चुकी झाली असल्यास कळवावी ह्मणजे दुरुस्ती केली जाईल. तसें अर्जदाराकडून न होतां चुकी शिलक राहिल्यास तिची जबाबदारी पोस्टआफिसाकडे नाहीं.

७ मनीआर्डरच्या रवानगीविषयीं पैसे भरणारास कांहीं पहाणें नाहीं, तें पोस्टाचें काम पोस्ट करील. परत जबाब येण्याच्या सुमाराची त्यानें वाट पहावी. त्यास पोस्टआफिसाकडून ज्यास रुपये पटतील त्याचे सहीची पावती येईल. पावतीस विशेष उशीर लागल्यास त्यानें पोस्ट आफिसास विचारावें. पावती मिळाल्यावर काम बरोबर झालें आहे किंवा नाहीं तें पाहून कांहीं उणीव असल्यास त्याचवेळीं पोस्टआफिसास कळवावें.

८ ज्या पोस्टआफिसाकडून कोणास मनीआर्डर मिळावयाची ती त्यांनीं त्या मनुष्याकडे पोचती करावी. व त्याजपासून पावतीवर सही करून घ्यावी व ती पावती मनीआर्डर जिकडून आली त्या पोस्ट आफिसाकडे पाठवावी. ज्याच्या नावानें मनीआर्डर आली त्याचा गावाचा पत्ता बदलला असेल तर मूळच्या आल्या ठिकाणीं मनीआर्डर जाऊन तिकडून ब्रिटिश इंडियांत कोठेंही तो असेल तर त्याचा पत्ता लिहून आला ह्मणजे तिकडे मनीआर्डर जाऊन त्याला मिळेल.

९ मनीआर्डरच्या अर्जामध्यें रुपये कोणत्या पोस्टआफिसांतून मिळावयाचे तें व हेड पोस्ट कोणतें ते अर्जदारानें लिहिलें पाहिजे. ह्मणजे तें आफिस सब पोस्त किंवा ब्रांच पोस्ट असलें तर हेड पोस्ट कोणतें तें त्यांत लिहिलें पाहिजे. मग दोहोंतून कोणत्याही पोस्टआफिसांत मनीआर्डर नेली असतां रोख पैसे मिळतील.

१० मनीआर्डरवर शेरा लिहून ती दुसऱ्याचे नावावर कधीं करून देतां येणार नाहीं. ज्यास पैसे मिळावयाचे त्यानेंच तिजवर सही केली पाहिजे मग तिचे पैसे घेण्याकरितां त्यानें स्वतां जावें अगर कायदेशीर दुसरे कोणास पाठवावें. पैसे घेण्याकरितां मनीआर्डर हातीं आल्यावर त्या दिवशीं किंवा दुसरे दिवशीं ती पटविण्यास जावें हें बरें, कारण लहान पोस्ट आफिसांत शिलक बेताचीच असूं शकेल सबब मनीआर्डर दिवसगतीनें नेल्यास व त्या आफिसांत पैसा शिलक नसल्यास पैसा आणवीपर्यंत त्यास कांहीं दिवस थांबावें लागेल. ज्या महिन्यांत मनीआर्डर लिहिली तो महिना जाऊन दुसरा महिनाही दरम्यान गेला तर त्या मनीआर्डरीस हरकत येईल. तथापि पुन्हा दुसरे कमिशनाबद्दल पोस्टांचीं टिकिटें त्या मनीआर्डरचे पाठीवर डकवून दिली असतां आणखी दोन महिन्यांचे मुदतीचे आंत केव्हांही पैसा मिळेल. व या दोन महिन्यांतही वर्‍हई प्रमाणें तजवीज झाली नाहीं तर मनिआर्डर रद्द होईल. ह्मणजे जून महिन्यांत लिहिलेल्या मनी आर्डरीस जुलै महिन्याचे अखेरीस हरकत येईल व सप्टेंबरचे अखेरीस ती रद्द होईल हें उदाहरण समजावें.

११ पैसे घेणारास लिहितां येत नसेल तर पोस्टाचे कामदारांनीं आपले समक्ष त्याची निशाणी करून घ्यावी व त्यास ओळखणारा आपले माहितीचा एक साक्षिदार घ्यावा.

१२ ज्या पोस्ट आफिसांतून मनिआर्डरीचे रुपये मिळावयाचे असें तींत लिहिलें असेल त्या आफिसाशिवाय दुसरे एकोद आफिसांतून आपणास रुपये मिळावे असें रुपये घेणारा इच्छित असेल तर त्यानें हेड आफिसास तसें कळवून त्या ठिकाणची आपले नावची अगर दुसरे कोणास रुपये घेऊं द्यावयाचे असतील त्याचे नावची नवीन मनिआर्डर मागावी. ह्मणजे दुसरे वेळचे कमिशन वजा करून घेऊन त्याचे इच्छेप्रमाणें तजवीज करण्यांत येईल.

१३ मनिआर्डर साऱ्या ब्रिटिश इंडियांत ज्याच्या नावची त्यास दिली गेली नाहीं, तर ती ज्यानें मूळ लिहिली त्याकडे परत पाठविली जाईल. व तीकरिता त्यास कांहीं डाकहशील वगैरे खर्च द्यावा लागणार नाहीं.

१४ एकोद गृहस्थानें कोणाचे नांवें मनिआर्डर केली व मागून अर्ज केला कीं ती त्याला दिली जाऊ नये तर ती त्या गृहस्थास परत आणून दिली जाईल. मग त्यानें बारावे कलमांत सांगितल्याप्रमाणें ज्या मनिआर्डरसाठीं अर्ज करावा आणि अशा गोष्टींत तिजबद्दल दुसरें कमिशन वजा केलें जाऊं नये,

१५ जर मनिआर्डर हरवली तर पैसे घेणारानें तिचें डुप्लिकेट मिळण्याबद्दल त्या पोस्ट आफिसास किंवा आफिसास अर्ज हेड करावा व त्याजबरोबर दुसरे कमिशनचे पैसे रोख द्यावे.

१६ एकवेळ पैसे दिले गेले असले तर पुन्हा तें पोस्ट आफिस त्या मनिआर्डरबद्दल आणखी पैसे देणार नाहीं.

१७ मनीआर्डरबद्दल खालीं लिहिलेल्या शर्ती ठरविल्या आहेत.

(१) दीडशे रुपयांहून अधिक मनिआर्डर होणार नाहीं. व आण्याचे फुटकळ भागाची मनिआर्डर होणार नाहीं.

(२) एका मनुष्यास एकाच मनुष्यावर एक दिवशीं चोहोहून अधिक मनिआर्डरी विशेष परवानगी शिवाय दिल्या जाणार नाहींत.

(३) बाजारभाव, शिलकेची सोय, अथवा दुसरे एकादें विशेष कारण मनिआर्डरी देण्यास मना करण्याजोगें असल्यास विशेष हुकुमानें मनिआर्डरी एकादे पोस्ट आफिसांतून दिल्या जाणार नाहींत.

(४) मनिआर्डर बद्दल कमिशन घेतलें जाईल तें:—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | रुपयांचे आंत | | ........ ........ | ॰२ |
| १० | चे वर व | २५ रु. | आंत | ॰४ |
| २५ | ,, | ५० | ,, | ॰८ |
| ५० | ,, | ७५ | ,, | ॰१२ |
| ७५ | ,, | १०० | ,, | १ |
| १०० | ,, | १२५ | ,, | १॰४ |
| १२५ | ,, | १५० | ,, | १॰८ |

(५) मनिआर्डर हरकतींत आली, हरवली वगैरे कारणाकरितां दुसरें कमिशन द्यावयाचें तें सदरीं लिहिल्याप्रमाणेंच दिलें पाहिजे.

हे १७ नियम हिंदुस्थानांतील मनिआर्डरकरितां व पुढें आणखी १२ नियम विलायतच्या वगैरे मनिआर्डर करितां छापून प्रसिद्ध झालेले आहेत.

---

## वासुदेव बळवंत फडक्याचें जन्मचरित्र

आमचे बंधु ज्ञानप्रकाश कर्ते यांस हें जन्मचरित्र मुकदम्यांत दाखल होतें त्याची नक्कल मिळाली आहे ती त्यांनीं साद्यंत ८ कालम छापली आहे. तींतून कांहीं माहिती आह्मी आपले वाचकांकरितां घेतों.

श्री दत्तात्रयायनमः मी पनवेल तालुक्यांत शिरढोणास शके १७६७ त जन्मलों. मला तीन भाऊ व एक बहिण आहे. १५ वे वर्षीं माझें प्रथम लग्न झालें व तें कुटुंब वारलें तिची एक मुलगी आहे व दुसरी बायको १४ वर्षांची आहे. २५ वे वर्षी मातुश्री मरण पावली. मी मराठी अभ्यास कल्याणचे सरकारी शाळेंत केला. इंग्रजी दोन बुकें डा. उईल्सनच्या शाळेंत शिकलों. पुढें ४ महिने मुंबईस नाना शंकर शेटचे शाळेंत व दीड वर्ष पुणें हायस्कुलांत अभ्यास केला. नंतर मुंबईल अडिट आफिसांत २० रुपयांची नोकरी लागली. व च्यार महिन्या नंतर ग्रांट मेडिकल कालेजांत चाकरीस राहिलों. नंतर कमिसरिएट एकझामिनरचे आफिसांत ३० रुपयांवर पुण्यास आलों. नंतर संध्या पुरुषसूक्त सुधारलें व सौर, रुद्र, पवमान शिकलों. आणि दत्ताची उपासना धरिली. नंतर मला स्वदेशाभिमान उत्पन्न झाला. मी असें पाहिलें कीं, हिंदुस्थानांत इंग्रज लोक राज्य करीत आहेत आणि हिंदू लोक अन्नावाचून उपाशी मरत आहेत. आह्मा लाख ब्राह्मणांपै

कीं एकादा त्यांचें कपट चाणत असेल. त्यांच्या सर्व कृती माईक. वर एक, आंत एक. एका मनुष्यास मोठी जागा दिली, ह्मणजे वर्तमानपत्रकर्ते, त्याविषयीं लिहूं लागतात. दुष्काळासाठीं यानीं कामें सुरू केलीं पण लोक त्यांत जाईनात. ५ शेरांची धारण आँणि दीड आणा पोटास, तो पुरतो कसा? तोंडानें अन्न खा ह्मणावयाचें आणि खुणेनें खालेस तर काठीनें मारीन ह्मणावयाचें अशी रीत आहे. लोक स्वदेशी माल वापरूं लागले तर विलायतच्या मालावरील जकात सुटण्याची तयारी झाली. १४ जिल्ह्याचे २१ जिल्हे केले ह्मणजे ७ कलेक्टर व ७ जडज जास्ती. त्यांनां दोन दोन हजारांहून जास्त पगार. लश्करी साहेब लोक स्वदेशीं जाऊं लागले. द्या पाऊणलाख रुपये. केला कायदा. कायदा ह्मणजे टंकसाळ. इत्यादि विचार माझे मनांत येऊन मीं व्याख्यानें देण्याची सुरुवात केली. माझीं लिहिलेलीं कित्येक व्याख्यानें पुण्यास लोकांजवळ आहेत. पनवेल, पळस्पें तासगाव, नरसोबाची वाडी एथेंही मीं व्याख्यानें दिलीं. सात वर्षे झालीं माझे मनांत हे विचार घोळूं लागले. साहेब पैसा गोळा करून नेतात, आपलीं एथें वसाहत करितात, धर्माची ग्लानी झाली, तर जेणेंकरून धर्मसंस्थापना होईल व लोक उपाशी मरणार नाहींत अशी कांहीं तजवीज काढावी. या उद्योगास मीं लागलों. सत्पुरुषाच्यागाठी घेतल्या अनुष्ठानें केलीं, ९ वर्षे गंध व पागोटें सोडलें, झोळी काखेला लाविली, नाशिक, नगर, खानदेश, उज्जनी, वऱ्हाड, नागपुर, इंदूर, कोलापुर, मिरज, सांगली, बडोदें, वगैरे पुष्कळ ठिकाणीं जाऊन कोळी. भिल्ल, गोंड उठवावे असा यत्न केला. इंग्रजांचा नाश कशानें होईल याविषयीं विचारांचें मला वेड लागलें. त्याकरितां निशाणें मारावयास शिकलों, तरवार खेळावयास शिकलों, ढाल बांधूं लागलों, पण कांहीं साधलें नाहीं. ५००० रुपयांपर्यंत सावकार मिळता तर दोन दोन चार चार माणसें महिना महिना पूर्वी पाठवून चहूकडे लहान लहान बंडे उभीं केलीं असतीं व तेणेंकरून इंग्रजांच्या पोटांत भीति उत्पन्न झाली असती. डाका, आगगाडी, तारायंत्र बंद झालें असतें. व मग तुरुंगांतून कैदी मोकळे केले असते. पण २०० दोनशें मनुष्यें मिळालीं नाहींत. रामोशांसी सख्य केलें. त्यांनां मेजवान्या दिल्या व त्यांबरोबर दरवड्यांत शरिक झालों, मनांतील हेतु कीं या योगानें तरी कांहीं द्रव्य व मनुष्यें जवळ झालीं तर घोडेस्वार, शिबंदी वगैरेंची तजवीज पुढें करूं. मुलगा झाला तर एकदमच मोठा होत नसतो, तो हळुहळु वाढतो, तसें चांगले पायावर लहानसें बंड करावें असा इरादा केला पण तो साधला नाहीं. रामोशी लोक कपटी व लबाड, ते जमलेल्या रकमेंतून चोऱ्या करीत आणि मलाच भाग मागत. व भाग मिळतांच घरीं जात. आह्मी कित्येक दरवडे घातले व लुटी केल्या पण ह्मणण्यासारखा विषय माझे हातीं कांहीं लागला नाहीं. कधीं ४००, कधीं ३००, कधीं १००; कधीं ५० व यांतही त्यांच्या वाटण्या असावयाच्याच हें पाहून त्रासून त्यांस सोडून श्रीशैलमल्लकार्जुनास आलों. हजामत करावयाची सोडून जटा वाढविल्या. हिंदुस्थानांतील प्रजेचें या लोकीं आपल्या हातून कल्याण होत नाहीं तर कुतऱ्यासारखें पोट भरून जगण्यांत काय कर्तव्य आहे? देवाजवळ शिरकमल तोडून घेऊन मरून जावें व स्वर्गीं लोकांची वकीली करावी असा निश्चय केला. या माझ्या सर्व जिवांतल्या गोष्टी एका मनुष्यास मात्र माहीत आहेत. चैत्र वद्य १२ शुक्रवार रोजीं श्रीशैलमल्लकार्जुनास आलों. वाटेनें व एकंदर कृत्यांत हाल पुष्कळ झाले. डोंगराचे कड्यावरून ५१६ वेळां पडलों, सर्प वगैरेपासून २१३ वेळां वाचलों, दोन दोन दिवस स्नान नाहीं, एकेक दिवस अन्न नाही, आठ आठ दिवस धोत्रांस पाणी नाहीं, कधीं उन्हांत कधीं छपून असे दिवस काढिले, असो. शुक्रवारीं एथें आल्यावर रविवारीं अनुष्ठानास आरंभ केला. ७ दिवसांचा करार. इतक्या मुदतींत प्रसाद न झाल्यास देवास देहार्पण करावयाचें असा निश्चय केला. उद्या वैशाख शुद्ध ५ शनिवार ७ वा व शेवटचा दिवस आहे. तीन दिवसांपासून तापाची छाया पडली आहे. त्यामुळें मन टिकणार नाहीं. याजकरितां रजा घेतों. तापामुळें लिहूं शकत नाहीं. राम राम.

---

## वऱ्हाड.

---

सुटी.—येत्या आठवड्यांत दिपवाळीचा मोठा उत्साह तीन दिवस आहे. व तो आमचे वर्तमानपत्राचे तयारीचे जे दिवस त्यांतच आला आहे सबब कारखाना बंद राहून वर्तमानपत्र निघणार नाहीं.

---

बुल्ढाण्यास सेशनाकरितां खुनाचे ४ मुकदमे होते. त्यांतील तिहींतील कैदीस फाशीच्या व एकांतील कैदीस जन्मपर्यंत काळे पाण्याच्या शिक्षा झाल्या.

---

रेसिडेंट साहेबांचे कोर्टांत वकिलीचें काम करण्याकरितां १० गृहस्थांस परवानगी मिळाली आहे त्यांत ८ गृहस्थ मुंबई, मद्रास, पुणें, सिकंदराबाद एथील आहेत, व दोन नांवें इकडील लोकांचे माहितींतील आहेत. एक रा. रा. सदाशिव नारायण सरकारी प्रासिक्युटर व दुसरे मि. बमनजी फिरोजशा सालिसीटर. रेसिडेंट साहेबांचे कोर्ट हें वऱ्हाडचें हायकोर्ट आहे. व वऱ्हाडांतील सर्व वकिलांस वऱ्हाडसंबंधी सर्व कोर्टांत वकिली करण्याची सनद आहे. व त्याप्रमाणें आमचे अकोल्याचे, उमरावतीचे वगैरे कित्येक वकील आजपर्यंत हैदराबादेस रेसिडेंट साहेबांचे कोर्टांत कामें चालविण्यास जात असतात. तेव्हां ती त्यांची मोकळीक कायम असून या १० गृहस्थांस आणखी परवानगी मिळाली असावी असें आह्मी समजतों. पण तसा खुलासा कळला नाहीं, व संशय उत्पन्न झाला आहे कीं वऱ्हाडांत वकिली करणारे रा. रा. सदाशिवराव व मि. बमनजी यांस वऱ्हाडचे संबंधानें तिकडे काम करण्यास जाण्याची मोकळीक असतां त्यांचीं दोघांचीच नावें इतर आठ परकी गृहस्थांबरोबर कां नमूद केली गेली? आह्मी अलीशान रेसिडेंट साहेबांस शिफारस करितों कीं त्यानीं या गोष्टीची स्पष्टता करावी व वऱ्हाडचे सर्व वकिलांस तिकडे येण्याची मोकळीक कायम ठेवावी. व त्यांस तसें करणें नसेल तर इकडच्या १० शार वकिलांचीं नांवें तरी त्या यादींत त्यांनीं रिक करावी.

---

जुडिशियल कमिशनरसाहेबांची स्वारी बुल्ढाणें जिल्ह्यांत असून ता अखेरपावेतों तिकडेच रहाणार आहे.

---

कमिशनर साहेब उमतीसच आहेत. व ते पुन्हा लवकरच फिरावर निघणार आहेत.

---

अलिशान रेसिडेंट त्यांची स्वारी पुढच्या महिन्यांत वऱ्हाडांत येणार असल्याची वार्ता प्र. सिं. त लिहि आहे.

---

खामगावच्या स्मालाज कोर्टाकडे एथील स्मालकाज जडज महिन्यांत १५ दिवस जातील असें लिहिं होतें पण ८ दिवस जाणार असें आतां कळतें.

---

मूर्तिजापुरचे रा.. वामनराव, जमादार यांचे बंधू रा. रा. जर्नार्दन गोबिंद यावरील उमरावतीच्या फौजद मुकद्म्याचा निकाल झाला. व जनार्दनस दोन महिने साधे कैदेची शिक्षा झाली आतां वामनरावावरील मुकद्म्याचें काय हे पहावें.

---

खामगावचे म्युसिप्यालिटीनें केरोसिन तेलाचे दोन डबे म दुकानांत ठेवून बाकीचे डबे व्यापाऱ्यांनी गावाबाहेर ३०० फुटा पलीकडे ठेवित ज असा नियम केला व त्यास रेसिडेंट साहेबांची मंजुरात मिळाली.

---

ले० क० मेंस साहेब थर्डक्लासचे आफिसियेटिंग सेकं क्लास डिपुटी कमिशनर झाले.

---

नेटिव डाक्टर जी पी डिसोजा व एम पुना बाल्म हे हास्पितल असिस्टंटचे परिक्षे पास होऊन ७ वर्षांहून त्यांची अधिक नोकरीही झाली ह्मणू त्यांस सेकंडक्लास आस्पितल असिस्टंट केले.

---

रा. रा. गोविंदराव यशवंतराव दर्यापुरचे तहशिलदार यांची एक महिन्याची हक्काची रजा त्यांचे आंवरून रद्द केली.

---

मि० स्टिर्ट फारेस्ट कडील थर्ड ग्रेड आसि० कान्सेवेटर होते ते सेकंड ग्रेड झाले.

---

पोस्टाचे इन्स्पेक्टर यांचें आह्मांस पत्र आलेलें दुसरेकडे छापिलें आहे त्याकडे सर्वांनीं नजर पोंचावी. व हरवलेल्या किंवा उशिरानें मिळालेल्या पत्रांचा त्यांकडे तादडतोब बेभाटा रीत जावा. हे गृहस्थ फार हुशार आहेत व या कामीं चांगलें लक्ष्य देतात. आमच्य चोरीस गेलेल्या पत्रांचा वहिमी मनुष्य सापडवा या धोरणानें त्यांनीं एक उत्तम तजोज केली होती पण वर्तमानपत्रांतील बोभाट्यानें चोर सावध झाल्या कारणानें त्या तजवीजीचें कांहीं रूप झालें नाहीं त्यास त्यांचा इलाज नाहीं.

---

इलिचपुरास कमळजा ओरतेचे मुकद्म्यांत आणखी कांहीं चोरीचा माल मिळाला, सबब पुन्हा धरपकड सुरू झाली आहे.

रा. रा. पांडुरंग दामोदर दवणकर रजेवर असलेले एथील मिडलक्लास स्कुलावरील हेडमास्तर यांनीं एका गृहस्थास कर्जाचे फेडींत मुंबईची एक हुंडी दिली तिच्या संबंधानें फौजदारी खटला उपस्थित झाला आहे असें कळतें.

---

मे० यासिनखा साहेब असिस्टंट कमिशनर यांची इलिचपुराकडून उमरावतीस पुन्हा नेमणूक झाली, व ते तेथें आले.

---

रेल्वेच्या दोन गाड्या इकडे झाल्या असून उमरावतीस एकच जात येत असे ती गैरसोय सरकारानें काढून टाकिली व सकाळची एक गाडी तेथें सुरूं केली. ती उमरावतीहून पहाटे ५। वाजतां निघत जाईल व ७ वाजतां उमरावतीस परत जात जाईल.

---

एथील ट्रेनिंग कालेजास दिपवाळीकरितां १२ दिवसांची सुटी मिळाली आहे.

---

इलिचपुरास टौनहाल बांधण्याचा निश्चय होऊन जागा पहाण्यांत आली. त्याचप्रमाणें एक सराई बांधण्याकरितां १२०० रु. खर्च करण्याची योजना झाली आहे. व. मि.

---

एथील लायब्ररीचेसंबधानें गेले आठवड्याचे उर्दूअखबारांत एक लांबलचक इंग्लिश मजकूर प्रसिद्ध झाला आहे, त्याविरुद्ध आह्माकडे एक पत्र आलें आहे पण तें त्यांनीं त्याच पत्राकडे पाठविलें तर बरें होईल. लायब्ररीचे खरोखर स्थितीचे संबंधानें आह्मी कांहीं लवकरच लिहू. पण सदर्हू पत्र छापून वाद उत्पन्न करावा अशी आमची इच्छा नाहीं.

---

सिविल प्रोसिजर कोड, रेजिस्ट्रेशन आक्ट, व मुदतीचा आक्ट यांचे दुरुस्तीकरितां झालेला सन १८७९ चा १२ वा आक्ट वऱ्हाडास लागू केला. व त्यांतील ९२ वें कलम वगळून "हायकोर्ट" या ठिकाणीं "रेसिडेंट साहेबांचें कोर्ट" 'ब्रिटिश इंडिया' या ठिकाणीं "हैदराबाद असाइंड डिस्ट्रिक्ट' आणि लोकल गवरमेंटचे ठिकाणीं "रेसिडेंट साहेब" इतका फेरफार केला आहे.

---

## वर्तमानसार.

काबुलाकडील वर्तमान.

अमिरानिषयीं संशय उत्पन्न झाला आहे. त्यावरील पाहरा सक्तीचा ठेऊन त्याचे नोकर बहुतेक दूर केले आहेत. व तंबूंतही संत्री असतो—रेसिडेंटच्या कत्तलेची चौकशी चालू आहे. ६० साक्षिदार झाले अजून ३० राहिले आहेत.—द्रव्य पुष्कळ सांपडत आहे. ब्रिटिश सरकारानें जाहिरनामा लाविला आहे कीं सर्व लोकांच्या संमतीनें नवा अमीर नेमला जाईल.

वासुदेव बळवंत याची सेशनांतील चौकशी सरकारतर्फे पुरी झाली. त्याचे वकील मि० महादेव चिमणाजी आपटे यांनीं डिफेन्स दिला कीं डायरी व जन्मचारित्र हे भ्रमिष्टपणाचे लेख आहेत. वासुदेवानें लढाई करण्याचा गुन्हा केला नाहीं. अन्नार्थी लोकांस सहाय करतां यावें. ह्मणून दरवडे खोरास सामील झाला होता.

रशियानें लंडन मधून आपले वकिलास परत बोलाविलें आहे.

गेले आठवड्यांत मद्रासेपासून १८ कोसांवर चिनामपेट एथें आगगाडीस मोठा अ

पाय घडून अनर्थ झाला. रात्रौ पाऊस अतिशय पडल्यानें एक पूल वाहून गेला होता व त्यावरून पहाटेचे ४ वाजतां गाडी जाऊन ती फसली गेली. थंडीची वेळ असल्यामुळें सर्व प्यासेंजर झोपी गेले होते. बहुतेक गाड्यांस इजा झाली व कांहीं कांहीं गाड्यांचा आणि ऐंजिनचा चुराडा झाला. १५ मनुष्यें मेलेलीं सांपडलीं व ४३ जखमी झाली. मलम्याचे ढिगांत आणखीही प्रेतें सापडतील असें ह्मणतात. एक युरोपियन स्त्री तिचें तान्हें मूल व दुसऱ्या एका युरोपियन गृहस्थाचें मूल मरण पावलें. एक सुभेदार मेला याप्रमाणे मोठा अनर्थ घडून आला हें कळविण्यास आह्मांस वाईट वाटतें.

सुरतेच्या म्युनिसिप्यालिटीस गेल्या सालांत २२८२३२ रुपये उत्पन्न झाले. व खर्च २६२७७५ रुपये झाला. बजेटचे अजमासापेक्षां जमा जकातींत घरपट्टींत व टोलडयूटींत कमी झाली.

पंजाबांत कोळशाच्या खाणी चालू करण्याविषयीं विलायेंतत एक कंपनी तयार झाली आहे.

स्पेन देशांत मोठमोठाले पूर येऊन त्याच्या योगानें खाणीचें व जमीनींचें फार नुकसान झालें. व पुष्कळ लोकांस धंदे नाहींसे झाले.

बंद केलें— कलादगी जिल्ह्यांत रेल्वेचें काम चालू असलेलें एकदम बंद करून रेलवेवर असलेले इंजनियरांस सोलापुरास बोलाविलें असें ऐकतों.

चिनी लोकांनीं काशगरिया प्रांत फिरून जिंकून घेतला आहे तरी तुर्कस्थानाच्या पूर्व भागांतील लोकांत कांहीं दंगा लवकरच उठेल असें ह्मणतात.

नार्दर्न पंजाब स्टेट रेल्वेवर रात्रौ विजेच्या दिव्यांचा उपयोग करूं लागले आहेत.

सेंटपिटर्सबर्ग येथें 'लोकांची इच्छा' या नांवाचें नवीन वर्तमानपत्र निघूं लागलें आहे, व ह्याचा उद्देश राज्यक्रांति करण्याचा आहे.

काबूल व शतरगर्दन यांचे दर्म्यान सूर्यकिरणाच्या योगानें बातम्या पोचविण्याचें काम सुरू झालें आहे.

अमिराचे गादीवर तूर्त कोणास बसवावयाचें नाहीं ह्मणून सरकारचा निश्चय झाला आहे.

जनरल राबर्ट्स यांच्या फौजेबरोबर काबुलावर जाणाऱ्या सामानाच्या ओझ्यांचीं बहुतेक सर्व जनावरें नाहींशीं झालीं, कांहीं मेलीं, कांहीं हरवलीं, कांहीं सोडून दिलीं व कांहीं निरुपयोगी झालीं, शिवाय चराशियापासून काबूलपर्यंत सामानापैकीं एक पंचमांशाचा पत्ता लागत नाहीं व दारूगोळ्यांच्या पन्नास पेट्या नाहींशा झाल्या असें समजतें.

सुबोध पत्रिका

पेशावर एथील पोलिसचे सुपरिंटेंडेंट मि० ब्रोन यांस काबुलमध्यें १००० रुपये पगारावर पोलिसांत नेमलें. नाईक कुतबुद्दीन एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर व जंग तहशिलदार महमद अखबरखान यांस काबुलामध्यें ए० आसि० कमिशनर नेमलें.

आफगाणिस्थानांत पाठविलेले गोरे शिपाई दररोज पुष्कळ मरत आहेत याचें कारण ते तेथील वाईट साईट द्राक्षें व इतर फळें खातात व त्यावर वाईट पाणी पितात हें आहे असें ह्मणतात.

जगदलक पर्यन्त तयार झा. काबूल पासून जलालाबादपर्यंत तारायंत्र सुरू झालें. शतर्गर्दन रस्ता बंद केला आहे व तेथून कांहीं सैन्य परत आलिखेल येथें पाठविलें व दुसरें काबुलाकडे नेलें.

## मुखमार्जन.

सर्व लोकांत दररोज प्रातःकाळीं तोंड धुण्याचा प्रघात आहे. त्याचे प्रकार निरनिराळ्या लोकांत निरनिराळे आहेत; परंतु तोंड धुण्याचा प्रघात मुळीं नाहीं असें कोणत्याच लोकांत आढळत नाहीं. आतां मुखप्रक्षालन केल्यापासून मुखावरील आणि मुखांतील त्वचा व तसेच दांत, जिव्हा आणि श्वासोच्छ्वास हीं सर्व स्वच्छ रहातात. या कृतीनें घाणेरडे विषयुक्त पदार्थ निघून जाऊन स्वच्छ केलेल्या भागांस आरोग्य प्राप्त होतें.

त्वचेची शुद्धि.—त्वचा कशी बनली आहे, याविषयीं यथास्थित माहिती झाली असतां ती स्वच्छ राखल्यानें आरोग्यास किती कारणभूत होते हें स्पष्ट ध्यानांत येईल. त्वचेचे दोन पडदे आहेत; एकीस अंतस्त्वचा व दुसरीस बाह्यत्वचा असें ह्मणतात. बाह्यत्वचा कांद्याच्या पापुद्र्यापेक्षांही पातळ असून ती नेहमी बदलत असते. ती बदलून जातांनां तिचा भूस होऊं लागतो. हा भूस कधीं कधीं आपल्या नजरेसही पडतो; व सूक्ष्मदर्शक कांचेंतून पाहिलें असतां त्वचेवर रेघा, केंस व बारीक छिद्रें दृष्टीस पडतात. हीच त्वचा पायांच्या व हातांच्या तळव्यांवर घर्षणामुळें जाड झालेली असते. हींत रक्तवाहिन्या व मज्जातंतु नसल्या कारणानें तीस सुईनें टोंचलें तरी तिच्यामधून रक्त निघत नाहीं किंवा टोंचल्यासारखा भासही होत नाहीं. हिच्या आंत अंतस्त्वचा किंवा जीस खरी त्वचा ह्मणतात ती असते. हीं सूक्ष्मदर्शक यंत्रानें पाहिली असतां ती तंतूंनीं गुंफिलेली असून त्यांत तैलपिंड व घर्मपिंड यांचीं मुखें दृष्टीस पडतात. वर सांगितलेला बाह्यत्वचेंतील छिद्रें तीं ह्यांचींच मुखें हो. ह्या खेरीज रोमांच, मज्जातंतूंचीं अग्रें लहान लहान उंचवट्यांमध्यें बसविलेलीं असतात व त्यांच्या सभोंवतीं रक्तवाहिन्या असतात या इतक्या सूक्ष्म असतात कीं, एक इंच जागेमध्यें सुमारें तीन हजारांपर्यंत त्यांचा समावेश होतो, अशांची एकदम गर्दी दृष्टीस पडते. ह्या प्रत्येक अवयवापासून काय काय उपयोग होतात ते पहा. बाह्यत्वचेचा भूस होऊन ती नाहींशी होते आणि तिच्या ठिकाणीं नेहेमी नवीन त्वचा उत्पन्न होत असते. तैलरंध्रांतील तेलकट पदार्थापासून त्वचेला नरमपणा येतो व कारबानिक आसिड, यूरिया इत्यादि आपल्या शरीरांतील विषकारक पदार्थ घामांतून बाहेर पडून रक्त शुद्ध होतें व शरीरांतील उष्णतेचें मान सतत एकसारखें रहातें. तोच घाम जर शरीरांत राहिला तर त्यापासून विकृति होईल. ह्याचें एक ढळढळीत उदाहरण आहे तें असें. विलायतेंत एका नटककार मंडळीनें एका मुलास स्वर्गांतील गंधर्वाचें सोंग देण्याकरितां त्याच्या सर्वांगास रंग लावून व त्याची काया सुवर्णाची दिसावी ह्मणून त्यावर सोनेरी वर्ख चिकटविला. त्यामुळें या मुलाच्या अंगाचीं घर्मरंध्रें बंद पडून घर्मांतून जाणाऱ्या विषयुक्त पदार्थांस बाहेर जाण्यास रस्ता न मिळाल्यामुळें ते अंगांत कोंडून राहिले आणि त्यामुळें तो लवकरच मरण पावला. साधारण ओंगळपणानें इतका मोठा व त्वरित अनर्थ जरी व्हावयाचा नाहीं तरी त्यापासून त्वग्रोगादि इजा झाल्यावाचून रहाणार नाहींत. ह्याचीं प्रत्यंतरें आपण नेहमी गरीब गुरीब लोकांत पहातों.

तोंडावरील त्वचा दुसऱ्या भागावरील त्वचे पेक्षां अधिक नाजूक असून, तिजमध्यें घर्मसंचय व तैलसंचय यांचें प्रमाण दुसऱ्या भागापेक्षां जास्ती असल्याकारणानें तिच्याविषयीं अधिक बंदोबस्त राखावा लागतो. दुसरें असें आहे कीं मनुष्याच्या सर्व अवयवांत मुख हें श्रेष्ठ गणिलें आहे. तर त्याची निगा जास्त राखावी हें उचित होय. "सर्वेषु गात्रेषु मुखं प्रधानं" आपलें तोंड स्वच्छ दिसावें असें जरी सर्व लोकांस वाटतें तरी ह्या कामांत आमच्या लोकांची हयगईच फार असते. साबणासारख्या स्वच्छता देणाऱ्या पदार्थांस अमंगळ असें आह्मीं ठरविलें आहे. हा गैर समजुतीचा प्रकार होय. तोंडावर फुटकुळ्या उठून काळसर डाग पडूं लागले ह्मणजे त्याविषयीं कोणाला वाईट वाटतें असे लोक आमच्यामध्यें फारच थोडे. तर ह्या संबंधानें इंग्रज लोकांची रीति पाहा. आई मुलाचा चेहरा स्वच्छ व निर्मळ ठेवण्याविषयीं नेहमी झटत असते. व त्यांत जर तोंडावर एकादी फोडी आली किंवा देवी आल्या तर तिचें मन लागलेंच अस्वस्थ होऊन जाऊन तोंडावर डाग राहूं नयें ह्मणून ती हजारो उपचार योजीत असते. चेहरा निर्मळ जर राखणें आहे तर तो दिवसांतून एकदा किंवा दोनदा स्वच्छ थंड पाण्यानें धुतला पाहिजे. नुसत्या पाण्यानेंच धुणें उपयोगी नाहीं. कारण त्यानें तोंडावरची तेलकटी साफ निघत नाहीं, ह्यासाठीं साबणाचा उपयोग केला पाहिजे. साबणानें तेलकटी जाते इतकेंच नाहीं तरें बाह्यत्वचेचा सुटलेला भूस स्वच्छ निघून अंतर त्वचेंतील रुधिराभिसरणास जास्त उत्तेजन मिळतें व त्यापासून त्वचेच्यां संबंधानें व्यापार जसे चालावे तसे चालूं लागतात. असा हा अत्युपयोगी पदार्थ साबण आहे. तो विकत घेतांनां कोणत्या प्रकारचा घ्यावा हें समजणें आवश्य आहे. साबणाची वडी अतिशय कठीण किंवा नरम नसावी व पाण्याबरोबर तिचा फेस सहज निघावा. तो त्वचेस लावल्यावर तिजमधून दाद किंवा चुरचुराट सुटूं नये, आणि तिला मृदुपणा येऊन तो गुळगुळीत रहावा. थंडीच्या दिवसांत तर साधारण बाजारी साबणाचा उपयोग करूंच नये, कारण त्यापासून त्वचेच्या अंगीं कडकपणा येऊन ती फिक्कट होऊन तिला भेगा पडतात. तर त्या दिवसांत ग्लिसराईन् साबूचा उपयोग करावा हें बरें- सुवासिक साबण मुलांस व स्त्रियांस फार उत्तमें परंतु मोठ्या पुरुषांनीं त्याचा उपयोग केला असतां डोक्याचे केस फार रांठ होतात. हजामतीच्या दिवशीं तर सुवासिक साबण तोंडास अगदींच लावूं नये. जो साबण मिळेल तो घेऊन लावण्यासारखी चूक दुसरी कोठलीच नाहीं तर साबण घेणें असल्यास नामांकित साबण करणारे आहेत त्यांचा किंवा खात्रीनें चांगला असें समजेल असा साबण घ्यावा. इतर साबणामध्यें हयगईमुळें किंवा घाणेरडेपणामुळें विषारी पदार्थ आंत पडून त्यांपासून त्वग्रोग उत्पन्न होतात. हल्लीं लोकांत कारबालिक साबणाचा उपयोग फार करितात. तर ही मोठी चूक आहे; त्याचा उपयोग त्वग्रोगांसाठींच केला पाहिजे. एरव्ही केला तर त्वचा रांठ होते. तोंड धुण्याच्या पाण्यांत थोडी "टायलेट विनिगर" टाकली तर बरें, ती फार आरोग्यकारक आहे. अशा रीतीनें मुखमार्जन करून जे स्वच्छ रुमालानें आपलें मुख थोड्या जोरानें दाबून पुसतील त्यांनां इतर फायदे असोत पण लागलीच त्यांच्या जिवास किती हुशारी वाटेल हें नित्य अनुभवानें कळतेंच. ज्यांच्या तोंडावर फुटकुळ्या किंवा मुरमे असतील त्यांनीं रात्रीस निजतेवेळीं टंकणखार पाण्यांत घालून तो विरघळल्यावर तें पाणी किंवा दुधांत गंधकाचा पूड टाकून तें तोंडास लावावें व सकाळीं वर सांगितल्याप्रमाणें मुखमार्जन करावें. मुरमाचीं व दुसऱ्या प्रकारचीं विलायती दुकानांत वगैरे औषधें पुष्कळ सांपडतात; परंतु त्यांत कांहीं फारसें हांशील दिसत नाहीं.

सु. प.


## जाहिरात.

## अभ्दुत ठकबाजी

अथवा

## एका धूर्त स्त्रीचें मनोवेधक चरित्र.

भार्या (गीति)

होतें मनुष्य सावध,
धूर्त ठकांची कृती समजल्यानें॥
यास्तव जनहो वाचा,
ठकबाजी एक वेळ प्रीतीनें॥१॥

धूर्त व ठक लोक भोळ्या, भाविक व जाणत्या लोकांसही फसवून नागवितात. याकरितां सर्व लोकांस ठकांच्या कृत्यांचें व कसबांचें ज्ञान व्हावें, ह्मणून आह्मी "अद्भुत ठकबाजी" या नावाचें पुस्तक तयार केलें आहे. यांत एका स्त्रीनें विलक्षण कृत्यें करून राजापासून रंकापर्यंत सर्वांस विलक्षण तऱ्हेनें फसविल्याबद्दल मनोवेधक गोष्टी आहेत. ह्या सर्व गोष्टींत लोकांस ठकविण्याकारितां ठक कसकशीं ढोंगें करितात, याचें यथातथ्य वर्णन केलें आहे. हें पुस्तक जाड घोटीव कागदावर सुवाच्य टाइपानें छापत आहे. ह्याचीं पृष्ठें द्वादशपत्रीं सांच्याचीं सुमार १२५ होतील, याची किंमत आगाऊ (येत्या नोव्हेंबर अखेर) देणारांस फक्त ८ आणे; मागाहून १२ आणे पडेल. बाहेर गावच्या लोकांस टपाल व बंगीखर्चाबद्दल १॥ आणा पडेल.

किमतीबद्दल पैसा पाठविणें तो मुंबईत म्यानेजर इंदुप्रकाश. म्यानेजर, नेटिव ओपिनियन. म्यानेजर, विविध ज्ञानविस्तार. यांजकडे पाठविल्यास पुस्तकें तयार होतांच रवाना होतील. टिकिटा पाठविणें त्या अर्धा आणा दराच्या वर्तळ्यासह पाठवाव्या. पुस्तकें डिसेंबर महिन्यांत तयार होतील.

पुस्तककर्ता.


हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १३ अकोला, रविवार ता० २३ माहे नोव्हेंबर सन १८७९ इसवी. अंक ४५

### वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु० |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १।८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

### नोटिसांबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळी पुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

### मुंबई ब्यांक.

अमानत ठेविलेल्या पैशावर व्याजाचे दर.

१२ महिने ठेविल्यास दरसाल दर शेकडा ४ रुपये.

६ महिने ठेविल्यास ( ह्मणजे तारीख १ नोवेंबर पासून ता० ३० जूनपावेतों एकसारखे कोणतेही सहा महिनेपर्यंत दरसाल दर शेकडा ३ रुपये प्रमाणें.

सदर्हू प्रमाणें न ठेविल्यास दरसाल दर शेकडा २ रुपये प्रमाणें व्याज मिळेल.

तात्पुरती किंवा मुदाम व्यवस्था केल्याशिवाय कमी मुदतीपर्यंत अथवा अधिक व्याजानें अमानत पैसा ठेविला जाणार नाहीं.

चालू अमानत पैशाच्या खात्यावर व्याज दिलें जाणार नाहीं.

मुंबई.

तारीख १ आगष्ट सन १८७९ इसवी.

### जाहिरात.

### हिंदुस्थानचें भूगोलपत्रक

हें उत्तम खिळे छापावर छापून बिक्रीस तयार आहे. मराठी चवथी इयत्ता शिकणारे मुलांस ह्या पत्रकावरून हिंदुस्थानच्या भूगोलाची माहिती अल्प श्रमानें होऊन नकाशा पाहण्यासही फार सुलभ पडेल. हिंदुस्थानच्या नवीन भूगोलांत असलेल्या सर्व प्रकारच्या माहितीचा समावेश ह्यां पत्रकांत झालेला आहे. किंमत दर प्रतीस पाऊण आणा, व ट० हां० बारा प्रतापर्यंत अर्धा आणा पडेल. बारा प्रती एकदम घेतल्यास ट०हा० पडणार नाहीं.

भास्कर बल्लाळ आपटे.
स्कू० मा० पिंप्राळें, ता० जळगांव
जि० खानदेश.

### नोटिस।

अर्जुन वल्लद राघोजी पाटील मौजे जवळे तुजरूक तालुके खामगाव यास करणानी वल्लद राघोजी पाटील मौजे मजकूर तालुके मजकूर याजकडून देण्यांत येते कीं, मौजे मजकूर एथील सर्वे नंबर १२०४८० रुपये १३ याचें खातें तुमचे नांवें असून भागणी बुकांतही माझे नांवें सालीम लागलेला असून सुमार २० वर्षांपासून वाहिवाटही माझी आहे. त्याचें खातें आमचे नांवें करून देत नाहीं सबब ही नोटिस देण्यांत आली आहे कीं. आठ दिवसांचे आंत शेताचा राजीनामा देऊन आमचे नांवें खातें करून द्यावें. सदर्हू मुदतींत राजीनामा न दिल्यास योग्य कोर्टांत फिर्याद करून घेतलें जाईल व या नोटिशीचा आणि कोर्टाचा खर्च तुह्मापासून भरून घेतला जाईल. या शिवायही वडिलोपार्जित राहिलेली जमीन तुह्माकडे आहे त्यांतील हिस्सा आमचा आह्मास द्यावा नाहींपक्षां त्या साठीही लवकरच तजवीज करावी लागेल. कळावें तारीख ११ माहे नोवेंबर सन १८७९ इसवी.

( सही ) किरनाजी वल्लद राघोजी पाटील. दस्तुर खुद्द.

### नोटिस

लखुजी वल्लद रामाजी दबडघाव जात कुणबी रहाणार मौजे सिरसोली परगणे बडनेर झगाजी तालुके अकोट यास मानाजी वल्लद राघोजी खोटे खादरखेडकर याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमची बायको तानकी इचे अंगावरील वासने वगैरे रुपये ४०० चे तिचे बापानें आणून आमचेकडे दिले व ते आह्मी तुह्मास द्यावे असें तुह्मी नोटिशींत लिहिलें ती गोष्ट खोटी आहे. आह्मी तुमचे बायकोचे वासनाविषयीं कांहीं जाणत नाहीं. व तुह्मी विनाकारण आह्मांस नोटिस दिली सबब खोटे कामाबद्दल तुह्मावर कायदेशीर तजवीज करणें जरूर आहे याचा जबाब ८ दिवसांत पाठवावा. व आमचे रुपये ४०० रोख तुह्मी नवरा बायकोनीं नेले आहेत ते आणून द्यावे. कळावें तारीख १८ माहे नोवेंबर सन १८७९ इसवी.

( सही ) मानाजी वल्लद राघोजी खोटे रहाणार खादरखेड परगणे बडनेर ता० अकोट याची हातची निशाणी रेघ.

### नोटिस.

जयाजी वल्लद जानजी ढोले जात कुणबी रहाणार मौजे जानोरी तालुके खामगाव मार्गे शिगाव. यास गंगा मर्द जयाजी ढोले हल्ली वस्ती येवतें तालुके अकोलें इजकडून देण्यांत येते ऐशीजे, तूं माझा लग्नाचा नवरा असून लग्न झाल्यास सुमार ३० वर्षें झालीं. व बरेच दिवस मी तुझा संसारही केला- आलीकडे गेले बारावर्षांत तुझे प्रकृतींत फरक पडून तूं वेड्यासारखा करूं लागला तेणें करून तुझें लक्ष्य प्रपंच्याकडील निघून माझी हेळसांड होऊं लागली ह्मणून मी आपले भावाचे शेजारी जाऊन राहिले व तुझी वाट पाहात १२ वर्षें बसलें आहे- परंतु तूं माझी परत केली नाहीं व माझे दुर्दैवाने माझा भाऊही मरण पावला अर्थात मला मोल मजुरी करून सावकार लोकांचें कर्ज काढून अन्न वस्त्र खर्च करावा लगल तेणेंकरून आज मला ५०० रुपये कर्ज झालें आहे. आतां हें कर्ज तुह्मी देऊन ही नोटिस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत मला आपले घरी घेऊन जावें व वागवावें हें न केल्यास तुह्मावर फिर्याद करून रुपये भरून घेईन व दुसरा घरठाव करण्याची कायदेशीर रीतीनें तजवीज करीन ह्मणून सदर्हू मुदतींत मला फारकती द्यावी न दिल्यास तुझा हक्क मजवर रहाणार नाहीं व कोर्ट खर्च तुजवर बसेल व या नोटिशीचा खर्चही तुजपासून घेतला जाईल. काळावें तारीख १९ माहे नोव्हेंबर १८७९ इसवी.

(सही) गंगा मर्द जयाजी ढोल इचे हातची बांगडी खुद्द.

### नोटिस.

लखुजी वल्लद रामाजी दबडघाव जात कुणबी रहाणार मौजे शिरसोली प्रगणे बडनेर ( झगाजी ) तालुके अकोट यास पुरणाजी वल्लद जानजी यवतकार राहणार मौजे उमरी तालुके अकोट याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्मीं आह्मांस टप्पांतून एक हातालिखीत नोटिस पाठविली ती पावली. तिच्यांतील मजकूर अगदीं खोटा आहे. व मनास वाटेल तसा लिहिला आहे. तुह्मांला आह्मीं आपली मुलगी गंधर्वानें दिली आमचा हेतु कीं, तुह्मी उभयतांनीं सुखानें नांदून संसार करावा पण तुमचें कपाळीं तसें आहे असें दिसत नाहीं. तुह्मी आमच्या मुलीस फार जाच करिता तरी ती सर्व सोसून तुमचे येथें कांहीं दिवस राहिली होती पुढें तुह्मीच दोन तीन माणसें बरोबर घेऊन येऊन तिला आपले हातानें आमच्या एथें आणून घातली व आह्मांस तिची गरज नाहीं असें ह्मणाला, याला साक्षिदार उमरीचा पाटील आहे. व तिच्या आंगावर वासने कांहीं एक नव्हती असें असतां आह्मी तिला घेऊन आलो व ४०० रुपयांची चीजवस्त तिचे आंगावरची आह्मी घेऊन आलों असें तुह्मी लिहिलें आहे. तें सर्व बातल आहे. तुमचा फुटका मणी एक कवडीचा देखील आह्मी लागत नाहीं. व ५ वर्षें मुलगी आमचे घरीं आहे तिला दरमहा ५ रुपये प्रमाणें ३०० रुपये पोटास लागले ते ही नोटिस पोंचतांच ८ दिवसांत-पाठवावे व आपली बायको घेऊन जावी. रुपये मुदतशीर न पाठविल्यास दिवाणी कोर्टांत दावा करून तुह्मापासून भरून घेतले जातील. तुमचे नोटिशीचा खर्च आह्मी लागत नाहीं. आह्मांस उत्तर देणें भाग पाडलें सबब हिचा खर्च तुह्मी पाठवून द्यावा कळावें. तारीख १८ माहे नोवेंबर सन १८७९ इसवी.

( सही ) पुरणाजी वल्लद जानजी यवतकार याचे हातची निशाणी.

### नोटिस.

बनाम बालाराम वल्लद माणकचंद रहाणार पेठ मूर्तिजापुर यास खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं. तं आमचे बायकोचा आप्त असल्यामुळें तुला संग्रही बाळगून तुझें निभाविलें. पुढें तुझी गैरचाल दृष्टीस पडल्यावरून तुला घरांतून बाहेर काढलें तेव्हां तुला आतां आश्रय नाहीं कोणाचे घरीं जाऊं, मला कोण आश्रय देईल, अशा काळजींत पडून गयावया करूं लागल्यावरून आमचे खरड्याचे फिरणें मूर्तिजापुर व बिडगाव वगैरे ठिकाणचें ह्मणजे रुईचे हंगामबंदीचा जो व्यापार आहे त्या कामीं तुजला नेमून तुझे जिमेस प्राचीन गुमास्त्यासुद्धां खरड्याचें काम सोपलें त्या वेळेस खरड्यांत जमा सुमार साडे चार हजार रुपयाची होती ह्मणजे साडे अठरा हजार टक्याचा अढावा मैखरडा कागदपत्रासुद्धां सोपला त्याची वहिवाट तू स्वता व गुमास्त्याचे मदतीनें करून त्याचे हक्काबद्दल गुमास्त्याचे नेमणुकीप्रमाणें त्याणें घेऊन तुझे निर्वाहाकरितां दीडशें रुपये पर्यंत साल तूं घ्यावें व हा खर्च जातां नफा नुकसान आमचे आह्मांस वरचेवर तूं कळवीत जावें असे नेम झाल्यावरून तुझे स्वाधीन केलें त्यास सुमार तीन वर्षें झालीं अद्यापपर्यंत अढावा ह्मणजे अडसट्टा सालचे साल दाखल करण्याचा तसा केला नाहीं व तुला वरचेवर इकडून ताकिदी पोचत आहेत त्याजवर लक्ष पोचवीत नाहीस हें तुझे हक्कांत नीट नाहीं. गेले दिपवाळीस व सालमजकुरीं या दिपवाळीस तूं मामुलाप्रमाणें दिपवाळीचे पुजेचे खंरडा वगैरे कागद दुकानीं पूजेचे प्रसंगीं आणले नसून वहिवाटींत फरक आणला सबब तुला या नोटिसीनें कळविण्यांत येते कीं आमचे नावचा व्यापार खरड्यापुरता तुझे जिमेस केला आहे त्याजवर कोणाचें देणें नाहीं. व त्याजवर कोणाचें कर्ज घेण्याचें कारण नाहीं व मला माझा व्यापार खरड्या संबंधी कमी करण्याची व वाढविण्याची शक्ती आहे, कोणाचें कर्ज घेण्याची अगदीं गरज नाहीं व तुला तसें करण्यास परवानगीही नाहीं व खरड्यांत माझें नावापरतें दुसरें नाव देण्याची तुला परवानगी मुळींच दिली नाहीं व खरड्यांत कोणाचें कर्ज जमा करण्याची परवानगी नाहीं याविरुद्ध ज्या गोष्टी तूं करशील त्याचा जबाबदार तूं स्वतः होसील व याविरुद्ध जे लोक तुजसी व्यापार करतील त्यांची जबाबदारी तुझे जातीसी समजून करतील आह्मांशीं त्यांचा कांहीं संबंध नाहीं. खरड्यापुरता जबाब तुजपासून घेतला जाईल याजकरितां तुजला ही नोटिस पोंचल्यापासून आठ दिवसांची मुदत देण्यांत येत आहे तर तूं कागदपत्र अडसट्यासुद्धां आह्मांस सदरील मुदतींत समजून द्यावे पुढें नजरेस आल्याप्रमाणें योग्य तजवीज करण्यांत येईल याप्रमाणें करण्यास चुकाल तर एकदम तजवीज करून खरडा परत घेणें भाग पडेल.

सदर्हू गमास्ता व तुह्मी संगनमत करून माझे खरड्याची अव्यवस्था करणें सुरू केलें असें समजत आहे यास्तव ही नोटिस देण्यांत आली आहे.

तूं परवुद्धीस लागून आपलें सर्वस्व नुकसान करून घेत आहेस त्यास यापासून तूं पूर्वदशेत लवकर पोंचशील; नाहींपेक्षां सावध होऊन आतां तरी इमानदारीनें नवकरी करून गुजारा करशील तर तुझे हक्कांत बरें आहे. नाहीं तर तुझे प्राक्तनीं लिहिलेलें चुकणार नाहीं. कर्मानुसार बुद्धी तुला प्राप्त होत आहे त्याजला कोण चुकवील! कळावें. तारीख १८ माहे नोवेंबर सन १८७९ इसवी.

(सही) घासीराम गुलाबराय साहू
दुकान पेठ मुर्तिजापुर
निशाणी खुद हातची.

---

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजू नये.

---

रा. राजश्री वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:--

वि. वि. मी तारीख १० नवंबर रोजीं दक्षिणेकडील सडकेनें जात असतां रामया कोमटी याचे घराजवळ लोक जमा झाले होते आणि रोदन शुरू होतें तें पाहून त्या घरांत गेलों तों छपरीमध्यें रामया कोमटी खालीं निजविला आहे, आप्तजन रडत आहेत, लोक जमले आहेत, जबान बंद झाली आहे. त्या मांद्या मनुष्याची शकल मी पाहिली. नेत्र वर चढले, आंग काष्टासारखें झालें, किंचित् श्वासोश्वास मात्र चालत होता. किंचित कालानें मरेल असें सर्वत्रांस वाटत होतें. अशा समयांत येथील दवाखान्याचे खुदावक्ष डाक्तर यांजला बोलाऊन आणिलें. तेही तेथें होते. सर्वांनीं त्यानां प्रार्थना केली, डाक्तर साहेबांनीं त्याजला पाहून क्षणभर विचार करून दवाखान्यांतून औषधें आणवून योजना केली ती अशी कीं एक कुपी त्याचे नाकास लावून अर्धा मिनीट ठेवतांच त्याचा आखा खुलून नेत्र उघडले व जबान खुली झाली असें दिसलें. नंतर दुसरें औषध त्याला पाजलें तें पोटांत जातांच कांहीं शद्ब मुखावाटें बोलू लागला. तेथून एक मिनिटानें स्वतां उठून बसला नंतर एका मिनीटानें घरांत पलंगावर चालून गेला. हा चमत्कार पाहून सर्व लोक एकदम जयजयकार करून परम हर्षयुक्त होऊन तारीफ करूं लागले. प्रेतालाच उठविलें काय असें अत्याश्चर्य जनास झालें. महाराज डाक्तरसाहेबानें या वेळेस जी चिकित्सा केली तिची तारीफ जितकी करावी तितकी थोडी आहे. असा चमत्कार बहुधा क्वचितच नजरेस येणार. रामयाचे आप्तजनांनीं तत्काळ डाक्तर साहेबाला पाऊणशें रुपये नगद देणगी दिली. या रोग्यास एक महिन्यापासून तापाची मांदगी होती. गावठीं वैद्याचे उपचारानें अखेरचा प्रसंग आला होता. तो डाक्तर साहेबानें अडीच मिनिटांत दूर केला. हे डाक्तर स्वभावानें फार योग्य आहेत. यास या ग्रामांत अकरा वर्षे झाले असतील. लहानापासून थोरापर्यंत सर्वांसी स्नेह बाळगतात. त्यांच्या सुस्वभावास पाहून सर्व ग्रामस्थ संतुष्ट आहेत. कांहीं वर्षांपूर्वीं या गावांत कालराची बिमारी आली होती तेव्हां या डाक्तरानीं अतिशय मेहनत करून मांदे लोकांपैकीं बहुतेकांस बरें केलें. प्रसंगीं एक पंचमांशाचे आंत लोक जाया होऊन बरकड दुरुस्त झाले. ते समयीं ग्रामस्थांनीं सरकारास अर्जद्वारें कळवून वर्गणी करून देणगी दिली. या डाक्तर साहेबांचें अतःकर्णपूर्वक उपचार करणें व त्याबद्दल मेहणतीस कमी न करणें हे गुण पाहून ग्रामस्थजन आभार मानितात. मी नेत्रानें आश्चर्य पाहिलें तें आपलें समोर आणिलें. यास आपल्या सुंदर पत्रीं जागा मिळावी ही प्रार्थना आहे. हा विनंती.

वणी ग्रामस्त एक
"आश्चर्य पाहणारा."

---

## वऱ्हाडसमाचार.

---

मिति कार्तिक शुध्घ १० शके १८०१

---

## यांत्रिककलेवर पैरवी नसल्यानें हिंदुस्थानची दुर्दशा.

हिंदुस्थानचे आद्यंत स्थितीकडे लक्ष्य दिलें असतां महदाश्चर्य झाल्यावाचून रहात नाहीं यास कारण त्याची पूर्वींची धनकनसंपन्नता, कलाकौशल्यतेंत निपुणता, व सर्वोपरी जगांत त्याचें वर्चस्व. त्याचप्रमाणें त्याची हल्लींची दरिद्रावस्था, कलाकौशल्याचा क्षय व सर्व जगांत निकृष्ठावस्था हींच होय. यांत मुख्यत्वेंकरून कलाकौशल्याकडे दुर्लक्ष होऊन यांत्रिक कलेंत नवीन सुधारणा झाली नाहीं इतकेंच नाहीं तर मुळारंभीं यंत्रकारानें जी योजना केली ती सुद्धां रूपांतरानें नाहींशी होण्याच्या बेतास आली व तेणेंकरूनच याला दरिद्रावस्था प्राप्त झाली असावी. वस्तुतः यंत्रकरानें यंत्रांत थोड्या मेहनतीनें अधिक काम व्हावें अशी योजना केली आहे. जसें हातानें माती उकरण्यापेक्षां कुदळीचे योगानें स्वल्प आयासानें अधिक माती उकरली जाते, सरकी आणि कापूस निराळा करणें तें हातापेक्षां चरकानें लवकर होतें. मागावर तंतू एकांत एक गुंतवून वस्त्र तयार होतें. तेव्हां ही यांत्रिक योजनाच ह्मणावयाची. मात्र याहून सुलभपणा कसा होईल इकडे त्या पुढें कोणी लक्ष दिलें नसावें तेणें करून मुळारंभीं जें एकवेळा चालू झालें तेंच पूर्वापार चालू आहे पण त्यांत तिळमात्र सुधारणा झाली नाहीं. अलीकडे पाश्चिमेकडील लोकांचे यांत्रिक कलेच्या प्रभावानें व त्यांचे सतत उद्योगशीलतेनें या हिंदुस्थानांतील यांत्रिककला अगदी निरुपयोगी अशी झाली आहे. ह्मणजे जें काम आमचे देशांत एका मनुष्याच्यानें ८ दिवसांत होणार नाहीं तेंच काम आलिकडील यंत्राचे योगानें दोन तीन तासांत खलास होतें. हा सर्व यंत्रकाराचे योजनेचा प्रताप. ह्मणूनच हा आपले हिंदुस्थानांत तयार झालेल्या कपाशीचीं वस्त्रें आपणाकरितां विलायेतेहून तयार होऊन येतात. व तीं हिंदुस्थानांत तयार झालेल्या कपड्यापेक्षांहीं स्वस्त दरानें विकण्यास सांपडतात. या महदंतराचे येगानें यांत्रिक कलेची थोरवी एत्तद्देशीय लोकांचे मनावर चांगली बिंबला असावी व यास अनुसरून गेले पांच सात वर्षांत जिकडे तिकडे यांत्रिक कलेच्या संबंधानें चर्चा सुरू होऊन त्या विद्येचे काहीं माहितगार व कल्पकलोकांनीं नवीन युक्ती लढवून पुणे नागपुर वगैरे ठिकाणीं कापड विणण्याच्या मागाचे नमुने तयार केल्याचें प्रसिद्धीस आलें होतें; परंतु ते पूर्ण दशेस येऊन पोंचले नाहींत ह्मणून किंवा त्यांस द्रव्यद्वारा सहाय्य मिळालें नाहीं ह्मणून ते मागें पडले किंवा त्यांचें पुढें काय झालें तें समजलें नाहीं.

विलायती गिरण्यांची स्थापना अलीकडे आपले देशांत कित्येक ठिकाणीं झाली; परंतु त्यांतूनही निघावें तसें फायदेशीर काम नजरेस येत नाहीं. याबद्दल थोडे दिवसांपूर्वीं मुंबई वगैरे ठिकाणीं "गिरण्यांतून निघालेला माल शिलक आहे. व त्याचा खप होत नाहीं" असा बोभाट बाहेर पडला होता. त्यांतून अलीकडे नरसी केशवजीच्या दिवाळ्यानें दोन तीन गिरण्या कमकुवत झाल्या व जळगावची आग्नीप्रलयानें जमीनदोस्त केली. तें कसेही असो. पण विलायती यंत्राचें काम मोठ्या भांडवलाचें खरें व हल्लीं काळीं आमचे जवळ भांडवल नाहींसें झालें आहे. तेव्हां आमचे देशस्थितीमाफक यांत्रिक योजना बाहेर पडणें जरूर आहे. व हें सर्व कबूलही करतील. मांजराचे गळ्यांत घांट बांधण्याचे युक्तीप्रमाणें ती सर्वांस मान्य खरी परंतु ती बांधावी कोणी या गोष्टीची पंचाईतच. तशांतून जरी एकादा कोणी आपले सर्वस्वावर उदार होऊन तन मन धनेंकरून तशा उद्योगास लागला तर त्यावर उपाशी मरण्याचीच पाळी येणार यांत संशय नाहीं. व ह्मणून अशा प्रकारचे सदुद्योगाचें फळ बाहेर पडत नाहीं.

अशा प्रकारें सदुद्योगांत गुंतलेल्या गृहस्थास, निदान परंपरागत चालत आलेल्या कारागिरांस विद्वान् लोकांनीं बुद्धि द्वारा, श्रीमान लोकांनीं द्रव्य द्वारा व इतर थोर गृहस्थांनीं आपले लौकिकास अनुसरून धैर्य रूपानें सहाय्य करावें. तरच या हिंदुस्थानांतील निकृष्ठ दशेस आलेल्या कला कौशल्याचा जीर्णोद्धार होईल, व तेणेंकरून ही जी हल्लीं हलाखी दृष्टीस पडते ती अंशतः तरी लयास जाईल. नाहींपेक्षां जसे विणकर लोक व इतर कसबी लोक यांची अन्नान्न दशा होऊन हजारों घरांस ताळ्या लागल्या व सर्वत्र दारिद्र वाढून महर्गता व्याप्त व कायमची झाली ती कोठवर वाढत जाईल हें कळत नाहीं. ह्मणून उपयुक्त कलाकौशल्याकडे देशहितेच्छु लोकांनीं अवश्य लक्ष द्यावें.

विलायतेस हल्लीं जी यांत्रिक विद्येची भरभराट दिसून येते ती एकाएकी झालेली नाहीं. तिला दिवसगत लागले व लोकांकडून आणि सरकाराकडून आश्रय व उत्तेजनही तसेंच मिळालें. टिकिटांचे सभोंतीं छिद्र पाडणें, आगकाड्या करितां लकडाच्या पेटीची योजना करून देणें या गोष्टी साधारण नजरेनें जरी क्षुल्लक भासतात तरी ते सुचविणारांनीं लक्षावधी रुपये बक्षिस खावून जन्माचे भाकरीची फिकीर मिटविली. आतां आपल्या दैवयोगानें तेंच सरकार आपल्यावर राज्य करीत आहे. तेव्हां सरकाराकडून आपल्या देशांतील कलाकौशल्यास सहाय्य मिळण्याची उणीव होणार नाहीं हें उघड आहे व त्याप्रमाणें प्रदर्शनेंकरून उत्तेजन देणें, कलाकौशल्याचे वर्ग कालेजांतून स्थापन करणें व मजूर लोकांस रात्रीचे वर्ग काढून शिक्षण देणें इत्यादि प्रकार चालूही आहेत, परंतु विलायतेस लोकाश्रयानें जशीं मोठमोठालीं कामें उदयास येतात व एक एका महात्विक शोधाकरितां अगर योजनेकरितां लाखो रुपये बक्षिस देण्याचा पत्कार घेतात तसे प्रकार आमचे देशांत मुळींच ऐकू येत नाहींत अर्थात आमचे देशांतील लोकांनीं आपला औदार्य ध्वज उभारिला पाहिजे. इतकेंच लिहून आह्मी आपला लेख आज पुरा करितों.

---

## हिंदू व इंग्लिश यांचा विवाहसंबंध.

वर लिहिलेलें सदर पाहून आमचे कित्येक वाचकांस फार आश्चर्य वाटेल. पण त्यांस आह्मी खरोखर कळवितों कीं असे विवाह होण्याची सुरुवात झाली. हें आपले देशाला नवीन तऱ्हेचें वळण झालें. कोणा धर्मशास्त्रकाराच्या स्वप्नांतही ही गोष्ट मागें कधीं आली नसेल. व रुढी चालत आल्या त्यांच्याही विलक्षण मर्यादेबाहेर ही रुढी जात आहे. ब्राह्मणाब्राह्मणांत विवाह व्हावे असें असतां दटीकारांनी देशस्थ व कोकणस्थ ब्राह्मणांत होऊ नयेत व ऋग्वेदी आणि यजुर्वेदी यांत होऊ नयेत अशा अडचणी घातल्या. शास्त्राधार पहातां ब्राह्मण, क्षत्रीय व वैश्य यांत विवाहसंबंध व्हावे असा आहे मग अशा अडचणी नवीन काढून संकुचित व्हावें यांत काय फायदा आहे तो आह्मांस कळत नाहीं. हल्लींचा युरोपियन व हिंदू यांचा जो विवाह झाला तो युरोपियन राजकुलोत्पन्न ह्मणजे क्षत्रीय समजण्याच्या धोरणानें झाला असेल असें कोणास वाटेल पण तशी गोष्ट दिसत नाहीं. हा विवाह प्रचारांत आणणारांनीं हिंदू धर्म व हिंदू जाती याची परवा केलेली नाहीं. व ते ती तशी करण्याचे अगत्य बाळगीत नाहींत हें उघडच आहे. अस्तु. असा प्रकार किती कांस आवडतो व कितीक त्यांच्या बाजूचे होतात तें आतां पाहिलें पाहिजे.

सदरीं सांगितलेला नवीन प्रकारचा विवाह डा. आत्माराम पांडुरंग यांच्या कन्येनें केला. ती विद्याभ्यासाकरितां विलायतेस गेली होती. व तिनें इकडे आल्यावर बडोद्याच्या कालेजावरील व्हाइस प्रिन्सिपाल मि० लिटलडेल साहेब यांजबरोबर गेले मंगळवारीं मुंबईस हा विवाह केला. त्या समारंभास पार्शी व हिंदू प्रतिष्ठित गृहस्थ स्त्रियांसहवर्तमान बरेच गेले होते. व विवाहोत्तर त्यांनां उपहाराची मेजवानी झाली. डा. आत्माराम यांचे चिरंजीव विलायतेस गेले होते त्यांनींही तिकडे एका युरोपियन स्त्रीशीं विवाह केला आहे. या प्रकारें हें इंडियन घराणें युरोपियनांत मिसळलें व ही नवीन तऱ्हा त्यांनीं आपल्या देशास दाखविली.

---

## हिंदुस्थानांतील रेलवे.

गुदस्त सालअखेर हिंदुस्थानांतील एकंदर रेल्वेची माहिती प्रसिद्ध झाली आहे तिजवरून समजतें कीं हिंदुस्थानांत रेल्वे ८२१५ मैल झाली आहे. यांत व्यापारी कंपन्यांची ६०४४ मैल व सरकारी २१७१ मैल आहे. आरंभापासून आजपर्यंत रेलवे प्रकरणांत हिंदुस्थानांत ६०० कोटि रुपये खर्च झाले आहेत. त्यांत लोकांचे ९५ कोटी आणि सरकारचे २० कोटी आहेत. लोकांचे पैशास त्याचे उत्पन्नांतून व्याज तरी वर्षास मिळालें पाहिजे तें न मिळाल्यास सरकार आपल्या खाजिन्यांतून त्यांस व्याज देत असतें. हें आमचे वाचकांस ठाऊक असेलच यावरून इंग्लिश सरकार पाण्यासारखा पैसा कसा खर्च करतें तें समजतें. आमचे कोणा मराठी राज्याची, असा मातींत पैसा टाकण्याची कधीं छाती झाली नसती. आमच्या राजांजवळ पैसे उरले तेव्हां त्यांनीं हत्तीघोड्यांस सोन्यारुप्याचे दागिने केले, कोणी मक्केस मोत्याच्या चादरी लक्षावधि रुपयांच्या केल्या. व कोणी बसावयाच्या गाड्या, तोफा, हत्तीवरील अंबाऱ्या चांदी सोन्याच्या केल्या. त्यापेक्षां रेल्वेंत घातलेल्या पैशाचा किती उपयोग आहे तो दुष्काळ प्रसंगावरून सर्वांस समजलाच आहे. कंपन्यांच्या रेल्वेस फार उधळेपणानें खर्च होत होता सबब अलीकडे रेलवे करण्याचें काम सरकारानें आपले हातींच ठेविलें आहे. सदरील हिशेबावरून कळतें कीं कंपनीच्या रेल्वेस दर मैलास दीड लाखाहून अधिक रुपये लागले आहेत आणि सरकारी रेल्वेस सरासरी ९८००० रुपये लागले आहेत. सबब हें काम सरकारानें हातीं घेतलें हें फार चांगलें केलें. याचप्रमाणें इरिगेशन म्हणजे पाट बंधारे यांचें काम आपले देशास फार अवश्यक आहे. त्या कामीं सरकारानें असाच सढळ हात सोडला पाहिजे. म्हणजे दुष्काळाची भीति कमी होईल आणि आम्हांस खात्री नें वाटतें कीं ज्या देशांत पाट बंधारे व रेल्वे यांची विपुलता आहे त्या देशांत सहसा मनुष्य अन्नावाचून उपाशी मरणार नाहीं.

काबूल— बालाहिसार किल्ला जमीनदोस्त करण्याचे काम झपाट्याचे चालू आहे— त्या किल्यांत कोणी आढळला तर त्यास गोळी घातली जाईल असें ठरविलें आहे. ब्रिटिश सैन्य ठिकठिकाणीं दंगेखोर लोकांस धरून कैद करीतें आहे— दारूगोळा पुष्कळ सापडला त्यांतून कापास रगड होईल इतका ठेवून बाकीचा नासून टाकीत आहेत. फाशी देण्याचांही झपाटा चालू आहे. गेल्या आठवड्यांत ४९ मनुष्यें फाशी दिलीं. एक मनुष्य रस्त्यानें सुरी घेऊन चालला होता त्यालाही धरून फाशी दिलें. आतां सरकारानें माफीचा जाहिरनामा लाविला आहे कीं, जे लोक हत्यारें ठेवून शरण येतील. त्यांनां त्यांचे सर्व अपराधाची क्षमा केली जाईल. ते रेसिडेंट साहेबांचे झालेले कत्तलींपैकीं मात्र नसावे— काबुलचा वसूल एक कोटि पंचवी लक्ष रुपये आहे— मुंबईचे गवरनर सर रिचर्ड टेंपल साहेब कंदाहारास गेले आहेत— काबुलास थंडी मनस्वी पडूं लागली आहे बर्फ पडत असतें— राबर्ट साहेब यांस पूर्व अफगाणीस्थानचे लेफ्टिनेंट जनरल नेमिलें— पेशावरापासून जलालाबादेपर्यंत रेल्वे होणार आहे.

**वासुदेव बळवंत फडके**— याचा ग्रंथ संपला. पुण्याच्या सेशन जडजांनीं त्यास जन्मपर्यंत काळेपाण्याची शिक्षा दिली. व सरकारानें त्यास काळेपाण्यावर पाठविण्याकरितां ठाण्यास रवाना केलें. वासुदेवाचे बापानें त्याची भेटघेतली तेव्हां सांगितलें कीं तुझी बायको तुजबरोबर येण्यास तयार आहे. तो म्हणाला मला तिकडे गेल्यावर कसें काय करावें लागेल तें वर्ष सहा महिनें पाहून नंतर पत्र पाठवीन.

## वऱ्हाड.

इकडील व्हालंटियर पलटणीचे क्यापटन बुलक साहेब होते त्यांचे जाग्यावर डा० लिट्ल साहेब क्यापटन केलें. व मि० डेविस साहेब यांस लेफ्टिनेंट केलें. रिडसाहेबांनीं राजिनामा दिला. त्यांचे जागेवर मि. ए. ए. डी. जोन्स यांस सेकंड लेफ्टिनेंट केलें.

हिंदुस्थान सरकारानें एका प्रकरणांत ठराव केला आहे कीं जागेचें भाडें देण्याविषयींचा ठराव कोणा मनुष्याच्या खानगी जागेपुरता आहे. सरकारानें आपल्या एका खात्याकडून भाडें घेऊन तें दुसरे खात्याकडे जमा करावें हें योग्य नाहीं.

वऱ्हाडांतिल रेल्वेवरील गुन्ह्याची चौकशी युरोपियन माजिस्त्रेटापुढें होत जावी. असा मागें ठराव झाला होता तो फिरवून रेसिडेन्ट साहेबांनीं नवीन ठराव केला कीं, नेटिव किंवा युरोपियन कोणत्याहि माजिस्त्रेटानें त्याच्या हद्दींतील गुन्ह्यांची चौकशी करावी. विशेष महत्वाचे गुन्हे व युरोपियनानीं केलेले गुन्हे यांची चौकशी मात्र युरोपियन माजिस्त्रेटापुढें होत जावी.

मे० दस्तुर बहिमनजी साहेब सी. आय. ई. यांस तूर्त खामगावासही स्माल्काज जडज नेमिलें आहे व दर महिन्याचे चवथे आठवड्यांत त्यांनीं तेथें काम पाहण्यास जात जावें असें ठरलें आहे.

मि० हेर साहेब आफिशिएटिंग सेकंड क्लास असिस्टंट कमिशनर यांस तारीख २३ आक्टोबर पासून आफिशियेटिंग फर्स्ट क्लास असिस्टंट कमिशनर केलें.

मि० लाब टेंपररी एक्झिक्युटिव इंजिनियर यांस पूर्व वऱ्हाडाकडून मध्य वऱ्हाडाकडे नेमिलें व ते वाशिमास जाऊन काम पाहूं लागले.

मि० स्विनटन असिस्टंट इंजिनियर मध्य वऱ्हाड यांस २ महिन्यांची हक्काची रजा मिळाली.

विद्या खात्याकडील रा. ब. नारायण भाई साहेब दांडेकर, रा. रा. श्रीराम भिकाजी जटार, व रा. रा. बजाबा रामचंद्र प्रधान यांच्या स्वाऱ्या दिपवाळीचे सुटींत दौऱ्यावरून एथें आल्या होत्या त्या पुन्हा आपआपले कामीं परत गेल्या.

रा. रा. कृष्णराव हरी कोलटकर डि. कमिशनरचे क्लार्क आफ धी कोर्ट दिपवाळीचे पूर्वीं एथें येऊन थोडे आजारी झाले होते ते पुन्हा दुरुस्त होऊन स्वारींत गेलें.

रा. रा. रामजी शालिग्राम वणीचे पोलिस इन्स्पेक्टर आजारी होऊन एथें आले आहेत. व आतां त्यांची प्रकृति बरी हेत चालली आहे.

रा. रा. हणमंतराव यशवंतराव सबरेजिस्ट्रार रजेवरून परत येऊन आपले कामावर रुजू झाले.

रा. रा. बळवंत आबाजी दिवेकर बी. ए यांनीं येथून मुंबईस जाण्याचे पूर्वीं साहित्यशास्त्र या विषयांवर एथील मिडलक्लास स्कुलांत इंग्लिश भाषेंत एक उत्तम व्याख्यान दिलें. इंग्लिश जाणणारा श्रोतृसमाज बहुतेक आला होता व सर्वांस त्यांचें भाषण आवडलें. शांतपणें एक तासभर भाषणावरून वक्त्यानीं गृहित विषयाची माहिती यथास्थित सांगितली.

मलकापुराहून पत्र आल्यावरून समजतें कीं तेथें शाळेचें वार्षिक परीक्षेस बक्षिसें वाटण्याचा समारंभ मोठ्या थाटाचा झाला. सरकारी बक्षिसें वाटल्यावर शेट मथुरादास नाथाचे सावकारांनीं ८।९ रुपयांचीं पुस्तकें दिलीं व शेट बाळुसावजी यांनीं ▪ रुपयांची मिठाई मुलांस दिली. नंतर मि. एदलजी जमशेटजी अविंग्ग तहशिलदार यांनीं सुरस संभाषण केलें.

रा. रा. देवराव विनायक अकोल्याचे वकील ज्युडिशियल कमिशनर साहेबां बरोबर मलकापुरास गेले होते त्यांनीं तेथील शाळा पाहिली त्यावेळीं पहिला वर्ग प्रवेश परिक्षेस गेला होता व बाकीची शाळा सुटण्याचा समय होता म्हणून त्यांनीं मुलांची परीक्षा न घेतां कसरत पाहिली. व सर्व मुलांचा कसरती पोशाक सारखा असणें इष्ट व दर्शनीय आहे असें पाहून गरीब मुलांस तो मिळविण्यास मदत व्हावी म्हणून ५ रुपये बक्षीस दिले व कसरती पाहून खुश झाल्याचें कळविलें.

आगर एथें एक वर्षापूर्वीं घडलेल्या खुनाचा सुगावा लागल्यावरून तपास मोठ्या झपाट्यानें चालूं आहे व त्रिंबक देशमुख यास आरोपी पकडलें आहे. याची साद्यंत हकीकत आज स्थल संकोच्यामुळें आमच्यानें देववत नाहीं.

वऱ्हाडांतील हायस्कूल परीक्षेचा निकाल— अकोल्यास सातवे इयत्तेंत १ व सहावे इयत्तेंत २६ विद्यार्थी पास झाले. सातवे इयत्तेंतील विद्यार्थी वाशिम इं. म. स्कुलपैकीं आहे. व एथील इं.म. स्कुलाचे १०, बाळापुर कोर्ट २, शिगाव ३, खामगाव २, अकोट २, दर्यापुर १, मढगाव १, मेहेकर २, चिखली ३, असे २६ विद्यार्थी सहावे इयत्तेंत पास झाले. त्याचप्रमाणें उमरावतीस सातवे इयत्तेंत ६ पैकीं ३ मलकापुर इं. म. रॉठी स्कूलचे व ३ इलिचपुर इं. म. स्कूलचे सहावें इयत्तेंत ३१ विद्यार्थी पास झाले. पैकीं: उमरावती इं. म. स्कूलचे ९, इलिचपुर ५, दर्यापुर १, कारंजा ३, मंगरूळ १ यवतमाळ ५, वणी २, तळेगाव ३, देऊळगाव १, चिखली १. असें कळतें.

शेगांव येथील गुडस्क्लार्क बाबाजी यादव यानें कम्पनीच्या पैशाची कांहीं अफरातकर केली होती त्याबद्दलची चौकशी फार दिवस लांबणीवर पडलेली मे. किट्स साहेब हल्लींचे डे. क. ह्यांनी पुरी केली. व गेल्याच्या मागील मंगळवारीं बाबाजी ह्यास तीन वर्षे सक्त मजुरीच्या कैदेची शिक्षा दिली.

## वर्तमानसार.

रंपा एथील दंगा अजून कांहीं कमी होत नाहीं चंद्या दंगेखोर आजारी होता तो पुन्हा बरा होऊन त्यानें लुटालूट चालविली आहे.

विलायतेस "न्यूकोलेज" या नावाचे विद्यापीठ आहे त्याचा ५०० व्या वर्षाचा वार्षिक समारंभ नुकताच झाला.

रशिया व इराण मिळून तुर्कमन लोकांवर स्वारी करीत आहेत त्यांचा सारक एथें पराभव झाला.

भावलपुरचे नबाबास २८वे तारखेस गादीवर बसविण्याचा समारंभ होणार आहे.

लायसेन्स कराचा कायदा बदलणार आहे सालीना २५० रुपयांहून कमी उत्पन्नाचे लोक माफींत जातील. व सरकारी नोकर, वकील वगैरे माफींत आहेत त्यांवर कर बसेल. १२०० रुपयांच्या आंतील उत्पन्नाचे आफिसरात कराची माफी होईल.

म्युनिसिप्यालिट्यांची टाऊन ड्युटी आणि ढोलफंड यांचे संबंधानें हिंदुस्थान सरकारचे कायदे कौन्सलांत सर जान-स्ट्रेची साहेबानीं एक कायद्याचा मसूदा आणिला आहे-

अमदाबादेपासून पालनपुरापर्यंत रजपुताना रेल्वेची आगगाडी गेले रविवारपासून सुरू झाली.

रशियाचे बादशहाचा विचार आहे कीं, ओरेनबर्ग, तासकंद, व हिंदुस्थानाकडील रशियाचा भाग यांजमध्यें आगगाडी करावी.

## गेल्या रविवारीं झालेला पुनर्विवाह

गेल्या रविवारीं एथें ब्राह्मण ज्ञातींतील तेविसावा, व प्रार्थनासमाजाच्या मतानुसार दुसरा, पुनर्विवाह झाला. विवाह समारंभ गिरगावांत पोलिस कोर्टासमोर घर नंबर २१५ जेथें हल्लीं रा. रा. शंकर पांडुरंग पंडित ओरिएंटल ट्रान्स्लेटर हे राहतात, तेथें झाला. वराचें नाव रा. रा. बळवंत गोविंद गोडबोले. हे कोकणस्थ ब्राह्मण असून ठाणें कोर्टांतील वकील आहेत. ह्यांचे वय ३० वर्षांचें असून हे तेथील प्रार्थनासमाजाचे मोठे निश्चयी सभासद आहेत. वधूचें नाव उर्फ उमाबाई असून तिचा प्रथम संबंध कै बा. रा. रा.

गंगाधर चिंतामण यवतकर यांच्याशी झाला होता. बाळपणींच ही गतभर्तृका झाल्यामुळें व अलीकडे वर्षे दोन वर्षे तिला चांगलें सुशिक्षण मिळाल्यामुळें प्रार्थनासमाजाच्या मतानुसार गोडबोले ह्यांशीं पुनर्विवाह करण्याचा निश्चय तिणें केला व ईश्वरीकृपेनें तो सिद्धीस गेला. हिचे वडिलांचें नाव रा. रा. रामचंद्र मोरेश्वर घोलप आहे. हे देशस्थ ब्राह्मण आहेत दोन्हीही घराणीं कुलीन असून उभयतां वधूवरें सुशील व परस्परांस अनुरूप अशीं आहेत. वधूचें वय सुमारें १९ वर्षे आहे. याप्रमाणें उभयतांही प्रौढ असून त्यांनीं विवाह समारंभापूर्वीं माजिस्त्रेटासमोर आपला परस्परांशीं विवाह करण्याचा निश्चय कळवून प्रतिज्ञालेख केला नंतर पूर्वोक्त गृहीं विवाहसमारंभ झाला. त्यासमयीं सद्गृहस्थ व कुलस्त्रिया मिळून मंडळी सुमार ३०० जमली होती. विवाहसंस्कार " अलंकृत्यकन्यां उदकपूर्वां बुद्धिमते दद्यात् " या आश्वलायन सूत्रवचनानुसारें व प्रार्थनासमाजाच्या मतानुसारें ब्राह्मविवाहविधीनें झाला. विवाहसंस्कारांत पाणिग्रहणांतर्गत परंतु कांहीं ऋषींच्या मतें वैकल्पिक अतएव गौण जो होम, तो अनेक देवता दृष्टिप्रयुक्त असल्यामुळें, तेवढा खेरीज करून विवाहसंबंधी सर्व विधि, व शिष्टाचार, व मुख्य मुख्य स्त्रीजनाचार करण्यांत आले. प्रथम संकल्पपूर्वक पुण्याहवाचन, नंतर मधुपर्कयुक्त वराचा सत्कार, नंतर संक्षेपतः साधारण ब्राह्मोपासना झाल्यावर अंतःपटधारणसहित मंगलाष्टकपठण, व पुढें पुष्पमालाबंधन, संकल्पपूर्वक व गोत्रादुच्चारपूर्वक कन्याप्रतिपादन, कन्या निवेदन " गृणामिते सौभगत्वायहस्तं .व धर्मेच इ० प्रतिज्ञापूर्वक इत्यादि मंत्रानें पाणिग्रहण, सूत्रवेष्टन, कंकण बंधन, मंगलसूत्रबंधन, अश्मारोहण व सप्तपदीक्रमण, याप्रमाणें सर्व विधी झाले. शेवटीं विवाहरूप धर्मसंस्काराचें महत्व व गार्हस्थ्यधर्म याविषयीं वधुवरांस बोध झाल्यानंतर ईश्वरप्रार्थना होऊन विवाहविधी समाप्त झाला. संस्कारांतलि ह्मटलेल्या श्रौतसूत्रे त्यादि मत्रांचा अर्थ वधूवरांस सांगण्यांतआला. पौरोहित्य वेद शास्त्रसंपन्न रा. रा. गणेशशास्त्री बोडस व रा. रा. यशवंतराव मणेरीकर व रा. रा. शंकर पांडुरंग पंडित ह्यांच्या साह्यानें रा. रा. वामन आबाजी मोडक ह्यांनीं केलें. विवाहविधि आटोपल्यावर जमलेल्या शिष्टांस व कुलस्त्रियांस विडे, तुरे वगैरे वाटून समारंभ समाप्त झाला. विवाह सकाळीं १० घटिकांचे सुमारास झाला. दोनप्रहरी भोजनसमारंभ झाला त्यावेळीं सुमारें ५०।६० मंडळी होती. या विवाहाचेवेळीं देशस्थ कोंकणस्थ व कऱ्हाडा यांमधील केवळ स्थलभेदेकरून चालू असलेला जो अगदीं अकिंचित्करभेद तो मंडळीनें एकीकडे ठेवून हा विवाह केला हें फार चांगलें झालें. तसेंच " सार्वकालमेकेविवाहं " या वचनास अनुसरून हा विवाह आश्विनमासीं झाला, हीही कालमर्यादा केवळ काल्पीनक व अकिंचित्कर असल्यामुळें तीही मंडळीनें एकीकडे ठेवून पुढें पाऊल टाकिलें हेंही चांगलें झालें. ही नूतनसंबद्ध वधूवरें सुखानें चिरकालपर्यंत सहधर्माचरण करोत अशी आह्मीं जगदीश्वरापाशीं अंतःकरणपूर्वक प्रार्थना करितों.

सु० प०

## शेतकऱ्यांनी आपलीं मुलें शाळेंत घालण्याविषयीं उत्तेजन देण्याचें अगत्य.

पुणें सार्वजनिक सभेचे प्रसिद्ध व उद्योगी चिटणीस रा. रा. गणेश वासुदेव जोशी यांनीं सदरील विषयावर नुकताच एक मराठी निबंध छापवून लोकांस वाटला. त्याची एक प्रत आह्मांस आली तिचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करितों. हा विषय खरोखर फार महत्वाचा आहे. या निबंधांत मि. जोशी यांनीं असें दाखविलें आहे कीं, ह्या देशांतील शेतकरी लोक अशिक्षित व अज्ञानी असल्या कारणानें ते मोठ्या घोटाळ्यांत आले आहेत ह्मणून शेतकीचें काम त्यांच्याकडून चांगलें होत नाहीं. यावरून मोठाले अनर्थ होतात. यास्तव त्यांस आपलीं मुलें शाळेंत विद्या शिकण्याकरितां पाठवण्याविषयीं उत्तेजन देणें हें सर्व सुशिक्षित व स्वदेशकल्याणेच्छु एतद्देशीय गृहस्थांस विहित आहे. हें ह्मणणें यथार्थ आहे. ह्या उपयुक्त निबंधाचा कांहीं भाग आह्मी आपल्या वाचकांसाठीं उतरून घेतों, तो येणेंप्रमाणें:—

"फ्यामिन कमिशनपुढें माझी जबानी पुष्कळ विषयावर झाली तेव्हां त्यांत ह्या संबंधाचा मजकूर जो विचारण्यांत आला व त्याचे मी जबाब दिले ते खालीं लिहिल्या प्रमाणें आहेत:—

मि. केअर्ड यांचा प्रश्न— बारा वर्षे रिणको धनकोमध्यें हिशेब चालला असतां त्यांची उभयतांस आठवण रहाण्याकरितां रिणकोजवळ कांहीं साधन पासबुकासारखें असावें असें तुह्मास वाटतें किंवा नाहीं ?

माझा जबाब— शेतकरी लोकांस पासबुकें ठेवून जमाखर्च समजण्याची अक्कल त्यांजला अद्याप आली नाहीं. त्यांजला प्रथम जरी समजलें नाहीं तथापि एक वेळ पासबूक त्यांजपाशीं ठेवण्याची वहिवाट झाल्यावर कांहीं दिवसांनीं त्यांजला समजूं लागेल. शेतकरी लोकांस विद्या शिकविण्यास जितकें उत्तेजन असणें जरूर आहे तितकें नाहीं.

मि. पील यांचा प्रश्न— मी डायरेक्टर होतो त्या वेळेच अनुभवावरून मजला माहीत आहे कीं शेकडा १६ शेतकरी विद्या शिकत होते.

माझा जबाब— आपल्यास काय अनुभव असेल तो असो, परंतु मी दोन दिवसांपूर्वीं मनमाड गाव मोठा असून तेथें गेलो होतों त्या समयीं तेथील शाळेंत गेलो होतों शाळेंत ७५ मुलें होतीं, त्यांत एक पाटलाचा मुलगा मात्र विद्या शिकत होता, शेतकरी कोणी नव्हता.

मि. पील यांचा प्रश्न— पाटील शेतकरी नव्हे काय ?

माझा जबाब— पाटील याणें आपले मुलास शाळेंत शिकण्यास घातलें याचे कारण पाटील या नात्यानें त्याजला सरकारांत सह्या वगैरे कराव्या लागतात. एवढ्याच कारणानें त्यानें आपला मुलगा शाळेंत घातला, दुसरें कारण नाहीं वास्तविक आपले हातानें नांगर धरणारा सावकाराशीं देण्या घेण्याचा ज्यांचा संबंध आहे असे शेतकरी लोकांचे मुलगे ५०० त एक जर शाळेंत विद्या शिकत असेल तर मोठें भाग्य समजलें पाहिजे.

शिवाय शेतकींत जास्ती सुधारणा होत नाहीं याचेंही कारण शेतकरी यांचे ज्ञानाचे कमीपणामुळें आहे असें अनुभवानें दिसत आहे व त्यांजला विद्या लिहिण्या वाचण्याची आली असतां शेतकी शिकण्यच्या शाळा निघाल्या आहेत त्यांत त्यांचा मोठा उपयोग होईल.

तूर्त माहितीकरितां पुणें जिल्ह्याची माहिती मिळविली आहे. जो पुणें जिल्हा इतर जिल्ह्यांत विद्येचे संबंधानें जरा पुढें आहे त्याच्या स्थितिवरून एकंदर दुसरे ठिकाणचें अनुमान होईल, पुणें जिल्ह्यांत ९,७२,३५० लोकसंख्या आहे, एकंदर शाळा १८१ आहेत पैकीं २ इंग्रजी व मराठी असें शिकण्याच्या व मराठीच शाळा १७९ आहेत त्यांत फक्त शेतकीवरच आपला निर्वाह करणारे असे लोकांचीं मुलें इंग्रजी व मराठी अशा ज्या शाळा आहेत त्यांत १ आहे व फक्त मराठी शिकण्याच्या ज्या १७९ शाळा आहेत त्यांत १३०६ मुलें आहेत. लोकलफंडाचें उत्पन्न जें सरकारास मिळतें त्यां पैकीं सरकारास विद्याखात्याकडे ३३५६० रुपये दरसाल देतें, व मुलांची फी व म्युनिसिपल कमिटीची मदत मिळून ८९३० रुपये आहेत. ही माहिती विद्याखात्याचे दप्तरांतून मिळाली आहे जी फक्त शेतकीवर निर्वाह करणारे लोकांचे मुलांची संख्या शाळेंत शिकण्यास येतात ह्मणून लागली आहे, तितकी असेल असेंही माझें अनुमान नाही. शेतकरी ह्मणजे त्यांत कोणी मारवाडी देणें घेणें करणारे अथवा वकील सब जडज याणें कोठें शेत केलें असेल. त्याचा मुलगाही शेतकरी मुलाचे संख्येत सामील होण्यास विशेष अडचण आहे असें नाहीं कारण शाळा लोकलफंडाचे मदतीनें आहेत. ही गोष्ट शाळा मास्तर यांस माहीत असून सरकारचा हेतू शेतकरी लोकांचे मुलांची संख्या शाळेंत विशेष असावी असा आहे तो सिद्धीस नेण्याच्या संबंधानें एकादे वेळेस चुकूनही जास्ती आंकडा शेतकरी लोकांचे मुलांचा पडण्याचा संभव आहे. यद्यपि आकडा अगदीं बराबर मानला तरी शेतकरी यांची लोकसंख्या जितकी आहे व त्यांजपासून जो लोकलफंड त्यांचे मुलांचे विद्येचा संबंधानें घेतला जातो त्या अदमासानें त्या लोकांत विद्येचा लाभ अगदी थोडा आहे असें सरकार कबूल करतें, ह्मणूनच सरकारचा हेतू शेतकरी लोकांचे मुलांची संख्या शाळेंत जितकी वाढविण्याचें होईल तितकी वाढवावी असा दिसतो.

ज्ञा. द.

---

## जाहिरात.

### इंडियन पिनलकोड ह्म० सन १८६० चा आक्ट ४५ वा.

**हायकोर्टाचे निवाडे व समजुती च्या टिपासुद्धां.**

सदहू आक्ट होऊन सुमारें १९ वर्षे झालीं. या मुदतींत सदहू आक्ट सुधारण्याकरितां बरेच आक्ट पसार झाले आहेत व त्याच प्रमाणें सदहू आक्टावर मुंबई, मद्रास व कलकत्ता हायकोर्टाचे ठरावही पुष्कळ झालेले असून ते सदहू आक्ट समजण्यास फारच उपयोगी आहेत. या सर्वांचा संग्रह एकत्र केला असतां त्यापासून लोकांची मोठी सोय होणार आहे. व शिवाय इंडियन पिनलकोडावर जी मेन साहेबानीं इंग्रजींत टिका केली आहे तशा प्रकारचा ग्रंथ मराठींत असावा अशी जी कित्येक लोकांची इच्छा आहे ती ही या ग्रंथापासून पुष्कळ अंशीं सफल होईल. या ग्रंथांत कोणकोणते विषय येतील, त्याची किंमत काय; व तो कधीं तयार होईल वगैरे बद्दलचा तपशील खालीं दिला आहे.

१ सन १८६० चा आक्ट ४५. २. हा आक्ट सुधारण्याकरितां त्याजपुढें झालेले आक्ट ३ सदहू आक्टांतील कलमावर १८७९ अखेरपर्यंत मुंबई, मद्रास व कलकत्ता हायकोर्टांनीं केलेले निवाडे व इंडियन लॉ रिपोर्ट सुरू झाल्यापासून अलाहाबाद हायकोर्टानें केलेले निवाडे ज्या ज्या कलमा खालीं संक्षिप्त रीतीनें व समजण्याजोगे दाखल केले जातील. ४ त्या शिवाय कांही विशेष माहिती देणें जरूर दिसल्यास तीही दिली जाईल. ५. या ग्रंथाचा उपयोग २ रे व ३ रे वर्गाचे माजिस्त्रेटांस व्हावा ह्मणून यांत खालीं लिहिलेले आक्टही नीट सुधारून जोडले जातील, व त्या आक्टावर झालेले हायकोर्टाचे ठरावही घेतले जातील.

१ सन १८६४ चा आक्ट ६ (फटके मारण्याचा) २. मुंबई सन १८६६ चा आक्ट ३ (जुगाराबद्दल.) ३ सन १८६७ चा आक्ट ८ (गावचे पोलिसाद्दल.) ५. सन १८७१ चा आक्ट १ (गुरांचे अतिक्रमणाबद्दल.) ६. सन १८७२ चा आक्ट ११ (परमुलखांतील अपराध्यांबद्दलचा.) ७. सन १८७४ चा आक्ट ९ (युरोपियन वेग्रन्सी आक्ट.)

सदहू ग्रंथ टायपांवर व चांगल्या कागदांवर छापला जाईल. ह्या ग्रंथाची किंमत आगाऊ रु० ५ व टपाल व बंगी खर्चाबद्दल ८६ आणे ठेविली आहे. ही किंमत ता. ३१ माहे डिसेंबर सन १८७९ चे आंत आमच्या आफिसांत भरावी. या मदतीपुढें ज्यास्त किंमत पडेल. सदहू ग्रंथ माहे जानेवारि सन १८८० अखेर तयार होऊन लोकांस देण्यांत येईल.

किंमतीबद्दल पैसे पाठविणें ते रोख किंवा पुण्याची दर्शनी हुंडी किंवा मनीआर्डर अगर नोट या रूपानें पाठवावेत.

पोस्टाचीं टिकिटें पाठविणें झाल्यास तीं अर्धा आणा दराची असून तीं दर रुपयास ८१ आणा बटवल्या प्रमाणें पाठवावीत. अर्धा आण्याहून जास्त दराचीं आल्यास तीं घेतलीं जाणार नाहींत.

कोर्ट फीचीं टिकिटें मुळींच घेतलीं जाणार नाहींत.

| | |
|---|---|
| पुणें—न्यायाश्रय आफिस. | त्रिंबकराव नारायण. |
| पेट शनिवार, मेहुणपुरा. | शिवराम हरी साठे |

तारीख १ नोवेंबर.

---

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १६ अकोला, रविवार ता० ३० माहे नोवेंबर सन १८७९ इसवी. अंक ४६

## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु० |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकां कडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसांबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळी पुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०२ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## मुंबई ब्यांक.

अमानत ठेविलेल्या पैशावर व्याजाचे दर.

१२ महिने ठेविल्यास दरसाल दर शेकडा ४ रुपये.

६ महिने ठेविल्यास ( ह्मणजे तारीख १ नोवेंबर पासून ता० १० जूनपावेतों एकसारखे कोणतेही सहा महिनेपर्यंत दरसाल दर शेकडा ३ रुपये प्रमाणें.

सदर्हू प्रमाणें न ठेविल्यास दरसाल दर शेकडा २ रुपये प्रमाणें व्याज मिळेल.

तातुरची किंवा बदाम व्यवस्था केल्याशिवाय कमी मुदतीपर्यंत अथवा अधिक व्याजानें अमानत पैसा ठेविला जाणार नाहीं.

चालू अमानत पैशाच्या सात्यावर व्याज दिलें जाणार नाहीं.

मुंबई.

तारीख १ आगष्ट सन १८७९ इसवी.

## जाहिरात.

### हिंदुस्थानचें भूगोलपत्रक.

हें उत्तम स्वच्छ छापावर छापून विक्रीस तयार आहे. मराठी चवथी इयत्ता शिकणारे मुलांस ह्या पत्रकावरून हिंदुस्थानच्या भूगोलाची माहिती अल्प श्रमानें होऊन नकाशा पाहण्याचेही फार सुलभ पडेल. हिंदुस्थानच्या नवीन भूगोलांत असलेल्या सर्व प्रकारच्या माहितीचा समावेश ह्या पत्रकांत झालेला आहे. किंमत दर प्रतीस पाऊण आणा, पण ट० हां० बारा प्रतींपर्यंत अर्धा आणा पडेल. बारा प्रती एकदम घेतल्यास ट०हा० पडणार नाहीं.

भास्कर बलाळ भाटे.

स्कू० मा० पिंप्राळे, ता० जळगांव

जि० खानदेश

## NOTICE.

Is hereby given for general information that a house-conservancy system is to be introdused and a latrine cess to be levied for carrying away all the rubbish as also for cleaning private latrines, and for cleaning these latter. The following rules are therefore made.

A Licence should be obtained every year on payment of one Rupee by a person who has got a private latrine and besides this, will have to pay a tax of six Annas a year per head using such latrine. Children under 12 years of age are exempted fromthe tax.

Those who will not take a licence and pay the cess as above will pay a house conservancy cess according to the following scale for carrying away rubbish from every house.

| | Rs. |
|---|---|
| A house which will fetch 10 Rupees a month as rent. | 3 |
| A house which will fetch 15 Rupees a month as rent. | 4 |
| A house which will fetch 20 Rupees a month as rent. | 5 |
| A house which will fetch 25 Rupees a month as rent. | 6 |
| A house which will fetch 50 Rupees a month as rent | 12 |
| A house which will fetch 75 Rupees a month as rent. | 18 |
| A house which will fetch 100 Rupees a month as rent | 24 |
| A house which will fetch any a mount above 100 Rupees a month as rent. | 30 |

It is the intention of the Municipality to levy taxes as above, if any body has an objection he is requested to make the same by delivering a written statement at the Municipal Office entering such objections.

Akola Municipal office 25th November 1879.

BYMANJEE JAMASPJEE
Vice President,
Akola Municipality.

## जाहिरखबर.

सर्वत्र प्रसिद्ध करण्यांत येते कीं कमेटीचे हद्दींतजमणारा कचरा वाहून नेणें व लोकांचे खासगी पायखाने साफ करणें, त्याचप्रमाणें ज्यांनीं घरीं पायखाने नाहींत त्यांच्यासाठीं सार्वजनिक पायखाने करून ते सदोदित साफ ठेवण्याची व्यवस्था करून सदर्हू खर्च भागण्यासाठीं मेहेतरपट्टीच्या ऐवजीं कान्सरवन्सी अथवा लाट्रिन सेस या नावाचा कर कमेटी बसवूं इच्छिते त्या कराचें वर्णन खालीं लिहिलें प्रमाणें:—

१ म्युनिसिप्यालिटीच्या हद्दींत ज्यांचे घरीं पायखाना असेल त्यांनीं पायखान्याकरितां लायसेन्स घ्यावा. अशा प्रत्येक लायसेन्साबद्दल वर्षास एक रुपया द्यावा लागेल. या शिवाय कुटुंबांतील प्रत्येक मनुष्याबद्दल दर वर्षास ०६ साहा आणे प्रमाणें निराळा कर द्यावा लागेल. १२ वर्षांचे आंतील मुलें करांतून वगळलीं जातील.

जे लायसेन्स घेऊन वरप्रमाणें इसमावरील कर देणार नाहींत त्यांनां घरसफाई पट्टी खालीं लिहिल्याप्रमाणें द्यावी लागेल.

| | रुपये |
|---|---|
| १ जें घर दरमहा १० रु० पर्यंत भाड्यास लायक आहे त्या घरांत राहणारांस सालीना | ३ |
| २ जें घर दरमहा १५ रु० पर्यंत भाड्यास लायक आहे त्या घरांत राहणारास सालीना. | ४ |
| ३ जें घर दरमहा २० रु० पर्यंत भाड्यास लायक आहे त्या घरांत राहणारास सालीना. | ५ |
| ४ जें घर दरमहा २५ रु० पर्यंत भाड्यास लायक आहे त्या घरांत राहणारास सालीना | ६ |
| ५ जें घर दरमहा ५० रु० पर्यंत भाड्यास लायक आहे त्या घरांत राहणारास सालीना | १२ |
| ६ जें घर दरमहा ७५ रु० पर्यंत भाड्यास लायक आहे त्या घरांत राहणारास सालीना | १८ |
| ७ जें घर दरमहा १०० रु० पर्यंत भाड्यास लायक आहे त्या घरांत राहणारास सालीना | २४ |
| ८ जें घर दरमहा १०० रुपयांचे वर कितीही रुपये भाडें देण्यास लायक असेल त्या घरांत राहणारास | ३० |

येणें प्रमाणें कर बसविण्याचा इरादा आहे तरी सदर्हू कराबद्दल कोणाची कांहीं हरकत असल्यास त्यानीं या नोटिसीच तारखेपासून १५ दिवसांचे आंत कमिटीचे आफिसांस लेखी कळवावें, ह्मणजे त्याजबद्दल विचार केला जाईल- कळावें

अकोला म्युनिसिप्यालिटी तारीख २८ नवंबर सन १८७९ इसवी-

बहिमनजी जामासजी
व्हाइस प्रेसिडेंट.

## जाहिरखबर.

अकोला म्युनिसिपल कमिटीकडून. तारीख १६।१०।७९ चे जनरल कमिटीच ठरावावरून सर्वांस प्रसिद्ध करण्यांत येतें कीं कमेटीनें मुकरर केलेले जागेखेरीज इतर ठिकाणीं कोणी मुडदे जाळूं नये अगर गाडूं नये. जर कोणा मनुष्यास आपलें प्रेत मुकरर झालेले जागेशिवाय कमेटीचे हद्दींत पुरणें जावें अगर जाळलें जावें अशी इच्छा असेल तर त्यांणीं मरणापूर्वीं कमेटींत अर्ज करावा ह्मणेज विचार होऊन हुकुमदेण्यांत येईल कळावें ता. २४ नोवेंबर सन १८७९ इसवी.

बहिमनजी जामासजी
व्हाइस प्रेसिडेंट.

## जाहिरात.

सर्व व्यापारी व सावकार वगैरे लोकांस खालीं सही करणाराकडून देण्यांत येते कीं, विश्राम वल्लद कृष्णाजा रंगारी रहाणार दारव्हा, विठू वल्लद अमृता रंगारी रहाणार दारव्हा व व्यंकटी वल्लद अमृता रंगारी रहाणार दारव्हा सदरहू तीन इसम आमचे विसादर या नात्यानीं अथवा वहिवाटदार या नात्यानीं वा दुसऱ्या कोणत्याही संबंधानें सदर्हू इसम जानसा होनासा रंगारी साहू दुकान कसबे दारव्हे याचे नावानें अथवा माझे नावानें तुह्मा लोकांपासून पैसा कर्जी मागतील अथवा तुह्मास माल लावणीं लावून पैसा घेतील वा दुसऱ्या कोणत्याही रीतीनें तुह्मा लोकांसी लेवादेवी करतील अथवा बेपार करतील तर तुह्मी त्यांस पैसा देऊ नये. कोणत्याही रीतीने वरीलें इसमांसी तुह्मा लोकांनीं लवादेवी अथवा बेपार करूं नये. केल्यास त्याजबद्दल आह्मी जबाबदार नाहीं.

जानसा होनासा रंगारी साहू या दुकानचें कर्ज अथवा पैसा अथवा माल मिळकत ज्या ज्या लोकांस देणें आहे त्या त्या लोकांनीं वगैरेल इसमास देऊ नये. जरकारितां दिल्यास ते मजरा मिळणार नाहीं कळावें, तारीख २४ नोवेंबर सन १८७९ इसवी.

( सही ) हरीसा जानसा रंगारी दुकान
दारव्हा. दस्तुर खुद.

## नोटिस.

रा. रा. श्रीकिसन जयसुक साहू दुकान खामगाव तालुके मजकूर यांस अकोले एथील रहाणार, पंच लोक यांजकडून अशी नोटिस देण्यांत येते कीं तुमचे दुकानीं आह्मी खालीं लिहिलेले इसमानीं रकम रुपये धर्मार्थ अमानत ठेविले ते रुपये आज पावेतो तुह्माकडून धर्मार्थ कामास मिळाले नाहींत. यास्तव या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं रकम रुपये २५० अक्षरी दोनसे पन्नास आज पासून ८ दिवसांचे आंत दाखल करावे. आपण न दिल्यास शिरस्तेप्रमाणें दिवाणी कोटांत दावा करण्यांत येईल यास्तव ही नोटिस पूर्वीं आपणास सूचनार्थ दिली आहे तर यांत लिहिल्या प्रमाणें फिर्याद न करितां रुपये मिळावे. दावा केल्यास आपणावर विनाकारण खर्च पडेल. कळावें तारीख २४ माहे आक्टोबर सन १८७९ इसवी.

( सह्या )

जोरावरमल गंगाधर.

रघुनाथदास रामप्रताप.

कनूलाल कुंजीलाल.

## नोटिस.

गणेश सखाराम उदास जोशी ब्राह्मण रहाणार कसबे वतूर तालुके जुन्नर जिल्हे पुणें यांस मोतीलाल जयगोपाल साहू दुकान मौजे चतारी तालुके बाळापुर जिल्हे अकोलें प्रांत वऱ्हाड यांजकडून देण्यांत येते ऐशी जे तुह्मी आमचे गावीं मास्तर असतां व आमचे घरीं गुमास्ते असतांनां आमचे दुकानचे रुपये १२२०५॥ खाते बाकीवर घेतले व त्याचें व्याज आज पर्यंतचें ४८ रुपये एकूण

१७०८९॥ एकशें सत्तर साडेपांच आणे येणें आहेत हे रुपये तुह्मी एयून जातांनां सांगितलें कीं घरीं जाऊन एक वर्षानें पाठवून देतों. परंतु या गोष्टीत एक वर्ष जाऊन शिवाय हे आठ महिने झाले तरी तुह्माकडून रुपये आले नाहींत व पत्रही आलें नाहीं. ह्मणून ही मुदामें नोटिस देण्यांत आली आहे तर ही पावल्यापासून तीन महिन्यांचे आंत व्याजासुद्धां सर्व रुपये आणून द्यावे. सदर्हू मुदतींत न दिल्यास रीतीप्रमाणें फिर्याद करून रुपये घेतले जातील. व तेणेंकरून कोर्टखर्च तुह्मावर बसेल. नोटिशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावें तारीख २७ माहे नोंवेंबर सन १८७९ इसवी.

( सही ) मोतीलाल जयगोपाळ साहू
दुकान मौजे चतारी
दस्तुर खुद.

## वऱ्हाडसमाचार.

मिति कार्तिक वद्य २ शके १८०१

## युरोपियनांचें नेटिवांसी सौजन्य

आपले देशांत ही मोठी उणीव आहे. मोठमोठे युरोपियन कामदार आपले देशांत पुष्कळ असून ते विद्वान व समजसंही आहेत. पण नेटिवांसी प्रेमभावानें वागावें हें त्यांस फारसें आवडत नाहीं. व बहुतांस नेटिवांचा तिटकारा असतो. ही गोष्ट फार वाईट आहे. साहेब लोक जितकें नेटिवांस चाहतील व त्यांच्यांत मिळून मिसळून राहतील तितकें त्यांस व आमचे देशास अधिक हितावह होणार आहे. सबब या गोष्टीकडे युरोपियन लोकांचें चित्त अधिक वळावें असें आह्मी इच्छितों. साहेब लोकांचे राहणें गावाबाहेर, त्यांचीं कामें काजें गावाबाहेर, त्यांचा नेटिवांसी संबंध कामापुरता, त्यांचे घरीं नेटिव लोक गेले तर भाषण मोजक्या शद्बांत व मोजक्या मिनिटांत होऊन उठण्याची सूचना, कित्येक युरोपियनांकडे नेटिव लोक भेटीस गेले तर त्यांस बरें वाटत नाहीं, कित्येक त्यांचा आदर सत्कार करीत नाहींत, मग गावांत वारंवार येऊन नेटिवांत मिसळण्याची गोष्ट दूरच राहिली, अशानें परस्परांत प्रेमभाव कसा वाढावा? व सौजन्य कसें राहावें? तें उघडच दिसत आहे. युरोपियनांप्रमाणेंच नेटिव लोकही मानव आहेत. त्यांच्या प्रमाणेंच नेटिवांसही बुद्धिमत्ता, विद्वत्ता व ज्ञान आहे. मनाची थोरवी उभय ज्ञातींतही आहे मग असें फटकून वागण्यांत त्यांस काय विशेष वाटत असेल तें वाटो. त्यांचें नेटिवांवाचून अडत नाहीं ही गोष्ट खरी आहे. पण त्यांकडे जो सरकारी अधिकार असतो तेवढा संबंध बाजूस ठेवला तर त्यांच्यावाचून नेटिवांचेंही कांहीं अडतें असें नाहीं. पण मनुष्यपणास व ऐक्यसुखास ज्या गोष्टी अवश्यक त्या सर्वांनीं लक्ष्य पूर्वक केल्यास जगांतील आपलें कर्तव्य कर्म केलें असें होतें. व युरोपियन लोकांचें ठाणें जें आमचे देशांत झालें आहे तें कांहीं अशीं भूतदया, परोपकार, सुधारणा, व परमार्थ यांकरितां आहे. असेंही कित्येकांचें ह्मणणें आहे आणि तें खरें आहे तर सर्व युरोपियन लोकांनीं नेटिवांत मिळून मिसळून वागावें हें फार अवश्य आहे. खरोखर युरोपियन लोक नेटिवांत मिसळले तर त्यांस बिलकूल हलकेपणा न येतां त्यांची थोरवी दिसून येईल' नेटिवांस त्यापासून फार लाभ होतील, व नेटिवांच्याही कांहीं चांगल्या गोष्टी त्यांस ग्रहण करण्याजोग्या सांपडतलि सबब तसें झालें तर फार चांगलें होईल.

कांहीं कांहीं युरोपियन गृहस्थ नेटिवासी फार ममतेनें व सलगीनें वागतात हें पाहून आह्मांस फार संतोष होतो. नगरचे जडज मे० वेडरबर्न साहेब हे या कामीं फार लक्ष्य पुरवितात. व त्यांस नेटिवांची फारच आवड आहे. मागें ते रत्नागिरीस असतां त्यांनीं नेटिव लोकांस आपले घरीं बोलावून त्यांचे उत्तम आगत स्वागत केलें होतें. व गेल्या आठवड्यांत नगरास त्यांनीं असाच मोठा उत्साह केला. सुमारे १०० सभ्य नेटिव गृहस्थ, व कित्येक स्त्रिया, मुली, आणि मुलें त्यांनीं आपले बंगल्यावर मेजवानीस बोलाविली होतीं. व या तयारीकरितां ते दहा बारा दिवस झटत होते. पुण्याहून रा. ब. केरो लक्ष्मण छत्रे, व रा. रा. गणेश वासुदेव जोशी यांनीं या समारंभास यावें ह्मणून त्यांनां त्यांनीं अगत्याचीं पत्रें लिहिलीं होतीं. त्याप्रमाणें गणपतरावजी गेले होते व केरोपंत मुंबईस परीक्षकाचे कामीं गेल्यामुळें त्यांचें नगरास जाणें झालें नाहीं. नगरचे कलेक्टर, तसेच मि० क्यांडी साहेब तेथील असिस्टंट कलेक्टर, व मुंबई इलाख्याचे डायरेक्टर मि० चाटफिल्ड साहेब व कित्येक युरोपियन स्त्रिया यांनांही त्यांनीं या समारंभाची मौज पहाण्यास बोलाविलें होते व ती सर्व मंडळी त्या थाटास गेली होती. साहेब बहादुरांनीं सर्व नेटिव लोकांच्या सन्मानपूर्वक भेटी घेतल्या व त्यांच्या मडम साहेबानीं स्त्रियांचें आदरातिथ्य केलें. मंडळी करितां चहा, काफी, फळफळावळ व मिठाई आणविली होती. कांहीं कर्मणुकीचे खेळ करविले, उत्तम दारू काम उडविलें. आणि शेवटास हार तुरे, पानसुपारी, अत्तर गुलाब देऊन सर्वांस संतोषित करून वाटेस लाविलें.

वेडरबर्न साहेबांच्या या कृत्याबद्दल आह्मी त्यांची तारीफ करितों. व बहुत साहेब लोकांनीं यांचा कित्ता घ्यावा अशी त्यांस शिफारस करितों.

## सौ० अनुसूयाबाई.

पंढरपुरच्या प्रसिद्ध पुराण सांगणाऱ्या सौ० अनुसूया बाई नागपुराकडे गेलेल्या परत जावयास निघाल्या त्या गेले सोमवारीं एथें आल्या आहेत. त्या दिवशीं कार्तिकी महाएकादशी असल्यावरून व त्या श्रीराजेश्वरीं उतरल्यावरून तेथेंच त्यांचा पुराणसमारंभ झाला. श्रीमद्भागवत दशम स्कंधांतील मथुरेहून श्रीकृष्णांनीं उध्धवास गोकुळांत गोपींचे शांतवनार्थ पाठविलें या कथाभागावर पुराण झालें. यांची पुराण सांगण्याची शैली चांगली आहे. पदपदशः अन्वय सांगून अर्थ सांगतात. व कथेकऱ्याप्रमाणें मधून मधून दृष्टांतानें, सुभाषितानें वगैरे उपदेश करून श्रोत्यांचे मनांत पुराण ठसेसें करितात. यांचें पुराण सर्वांस विशेष ऐकावयास सांपडावें ह्मणून राजेश्वरींच सप्ताह व्हावा असें मंडळीनें ठरविलें व त्याप्रमाणें नित्य रात्रौ क्रम चालू आहे. आजें सप्ताह समाप्ती होईल व बाई उद्या परवा एथून जातील.

सौ० अनुसूया बाई मध्यम वयांत असून बुद्धिमान व मोठ्या धीट आहेत. अध्ययन त्यांचें कितपत आहे तें चांगलेंसें समजलें नाहीं. पण बरेच श्लोक तोंडपाठ ह्मणतात. त्यावरून पुराणाचे कांहीं विशेष भाग त्यांनीं पाहून घेतलेले असावेत असें दिसलें. त्यांची मराठी भाषा चांगली व शुद्ध नाहीं. व तिजमध्यें त्यांनां कांहीं शिक्षण मिळालेलें आहे असें दिसत नाहीं; तथापि पुराणिकांचें काम इतर रेंग्या ढोंग्या पुराणिकापेक्षां त्या चांगलें करितात. साधारणतः स्त्रियांचा स्वर मधुर त्यांत इतक्या मजलेस आलेलें स्त्रीज्ञान पाहून ह्मणजे पुराण सांगणारी स्त्री एथील लोकांनीं ही पहिलीच पाहिली असल्यामुळें श्रोतृसमाज पुष्कळ जमतो हें साहजिक आहे. अस्तु. आज पुराणसमाप्तीचा दिवस आहे तर लोक त्यांची चांगली संभावना करितील असें आह्मी इच्छितों.

नाशीक, पालकवाडी, नागपुर वगैरे ठिकाणीं या बाईचीं पुराणें झालीं त्यांची तारीफ बाहेरच्या वर्तमानपत्रांतून विशेष झाली आहे ती लोकांनीं वाचिलीच असेल व एथें प्रत्यक्ष अनुभव पाहिला आहे तेव्हां खरें मर्म लोकांस कळलेंच असेल. कसेंही असो. अनुसूया बाईनीं स्त्रीजातीच्या विद्वत्तेचें श्रेष्ठत्व लोकदृष्टी पुढें प्रथम आणिलें व धैर्यानें त्या गावोगाव पुराण सांगत हिंडूं लागल्या याजबद्दल त्यांची तारीफ केली पाहिजे. अजूनही त्यांविशेष शिक्षण मिळवितील व दोष सुधारतील तर अत्यंत प्रशंसनेस पात्र होतील यांत संशय नाहीं. व ही सूचना त्यांस आवडून तसें घडून आलें तर आह्मांस फार संतोष होईल.

बाईबरोबर त्यांचे वृद्ध तीर्थरूप सिद्धेश्वर बुवा ह्मणून आहेत. ते पंढरपुरास असतात व बेदराजवळ विठ्ठल सिद्धपुर ह्मणून एक गाव यांणीं वसविलें आहे. तेथें यांचा मठ असून शिष्यसंप्रदायी पुष्कळ आहेत. व बरें च उत्पन्न आहे असें सांगतात. पण डामडौल कांहीं दिसत नाहीं. दुष्काळामुळें व आगगाडीच्या लांबच्या प्रवासामुळें त्यांनीं लवाजमा आणिला नाहीं. एखदी खांद्यावर टाकून इतर भिक्षुक पुराणीक वगैरे येतात तशा थाटानें हिंडण्याचें त्यांस बरें वाटलें असें ह्मणतात. तें काय असेल तें असो. प्रस्तुत कन्येच्या विद्वत्तेवर त्यांची प्रतिष्ठा लोकांस दिसत आहे. बाईचें सासर सोलापुरास असून त्या माहेरीं असतात. व पतिराज त्यांच्याजवळ सासुरवाडीस असतात. ते प्रस्तुत स्वारींत नाहींत. व बाई गरोदर असून बाहेर पडल्या व बाळंत होण्याची संधी नजीक आली सबब परत जाण्याची त्वरा करीत आहेत. नाहींपेक्षां इतक्या दूर आल्याप्रमाणें वऱ्हाडांतही दुसऱ्या मोठमोठ्या गावीं त्या पुराणप्रसिद्धीकरितां गेल्या असत्या. अस्तु. पुढील वर्षीं त्यांनीं पुन्हा बाहेर प्रांतीं निघावें, मराठी भाषा शुद्ध करून घ्यावी, व नवरा किंवा कोणी समंजस मनुष्य मंडळीकडे हिंडणारा फिरणारा बरोबर घ्यावा, ह्मणजे त्यांची चांगली चहा होईल व फलप्राप्तीही चांगली होईल असें आह्मांस वाटतें.

## यांत्रिक कलेवर पैरवी असल्यानें फायदे

यांत्रिक कलेचें मूल तत्व आह्मी गेले अंकांत सुचविलें आहे. त्यावरून कुदळ, आपले देशी हातचरक, व साळी कोष्टी इत्यादि विणकर लोकांचे माग हीं यंत्रें ठरतात. त्याचप्रमाणें जातें, बैल गाडी, जासूद, सांगड ( तुंबे एकाला एक बांधून थोड्या पाण्यांतून तिरून जाण्याचे साधन ) व लेखक ही पूर्वींची आपल्या इकडील यंत्रेंच होत. कारण धान्यादिकांचें चूर्ण ती धान्यें एका धोंड्यावर ठेवून दुसऱ्या धोंड्यानें कांडीत बसण्यापेक्षां जात्याच्या योगानें थोड्या मेहेनतींत कार्य होतें, त्याचप्रमाणें ओझें वाहून नेण्याचें अगर प्रवास करण्याचें काम बैलगाडीच्या योगानें, बातमी पोंचविण्याचें काम जासूदाचे योगानें, पाण्यांतून तिरून जाण्याचें काम सांगडीचे योगानें, व ग्रंथ वगैरे लिहिण्याचें काम लेखकाच्या योगानें स्वल्प आयासानें अधिक होतें ह्मणून जातें, बैलगाडी, जासूद, सांगड व लेखक यांस यंत्रें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. व खरोखरच मुळारंभींच्या रानटी स्थितींत बहुतेक देशांतून हींच साधनें मोठीं मोलवान गणलीं गेलीं असतील. तेव्हां यांत्रिक कलेची ही पहिली स्थिति समजावयाची.

यावरील पहिल्या प्रकारच्या यंत्रांपेक्षां अधिक सोयीवार व फायदेशीर यंत्रांची योजना पुढें यंत्रकारानीं केली. ती अशी:— जात्याच्या ऐवजीं पानचक्की, पवनचक्की, गाड्यांचे ऐवजीं कमानीची व छत्री सायवानची गाडी, जासुदाचे ऐवजीं टपालखातें, सांगडीचे ऐवजीं नाव, गलबत, लेखकाचे ऐवजीं मोर्तब, शिक्के, ठसे, मुद्रा, छाप इत्यादि साधनांची प्रसंगोपात तयारी केली व हीच आपल्या इकडील यंत्रकलेची दुसरी व शेवटची स्थिति समजली पाहिजे. कारण या स्थितींतील यंत्रसाधनांवर पुढें कोणी विचार केल्याचें दिसून येत नाहीं. व कदाचित कोणी केलाही असेल तरी त्यास फलप्राप्ती झाल्याचें ऐकिवांत नाहीं, तथापि पुराण प्रसिद्ध जीं कांहीं अनान्वित आख्यानें वर्णिलेलीं आहेत त्यांवरून आपल्या पूर्वजांनीं तिसरीही स्थिति अनुभवलेली असावी असें क्षणभर वाटतें; परंतु त्यांपैकीं आमचे हातीं कांहींच शेष न राहिल्यानें ह्मणा अगर खरोखरच तीं वर्णनें केवळ कल्पित कादंबऱ्याच रचलेलीं असून ह्मणा त्यावर खात्रीनें विश्वास ठेवबत नाहीं व तो ठेवून विशेष नफा होणार आहे असेंही नाहीं व या गोष्टीचें तूर्त कांहीं प्रयोजनही नाहीं. अस्तु.

आतां यांत्रिक कलेच्या तिसऱ्या स्थितीविषयीं विचार करूं. युरोप व अमेरिका यां खंडांतील सुधारलेलीं राष्ट्रें या स्थितीचा उपभोग हल्लीं घेत आहेत व तेणें करून त्यांस मोठें ऐश्वर्य प्राप्त झालें आहे यांचें कारण असें:—